सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. ०९ फेब्रुवारी २०२६ | वर्ष – ३ रे | अंक ३०३ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# दहशतवादाशी कोणतीही तडजोड नाही

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मलेशियातून ठणकावले

**क्वालालंपूर/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या दोन दिवसांच्या मलेशिया दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात अनेक महत्वाच्या करारावर स्वाक्षरी होण्याची शक्यता आहे. तसेच पंतप्रधान मोदी आणि मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्यात द्विपक्षीय चर्चा झाली आहे. पंतप्रधान मोदींचं मलेशियात जंगी स्वागत करण्यात आलं. यावर बोलताना 'मलेशियातील स्वागत भारत कायम लक्षात ठेवेल', असं म्हणत मोदींनी मलेशियाचे आभार मानले.

पंतप्रधान मोदींनी मलेशियात बोलताना दहशतवादावर मोठं भाष्य करत पाकिस्तानला अप्रत्यक्ष संदेश दिला. 'दहशतवादाबाबत भारताची भूमिका ठाम आहे, दहशतवादाबाबत भारताचा संदेश अगदी स्पष्ट आहे. दहशतवादाशी कोणतीही



तडजोड होणार नाही', असं म्हणत मोदींनी दहशतवादाचा मुकाबला करण्याबाबत भारताच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला.

दरम्यान, भारत आणि मलेशियामधील धोरणात्मक विश्वास हा आर्थिक परिवर्तनाचा मार्ग आहे, यावर भर देत पंतप्रधान मोदींनी रविवारी दहशतवादाबाबत भारताची भूमिका दृढ आणि तडजोड न करता कायम असल्याची स्पष्ट केलं. शांततेच्या उद्देशाने केलेल्या सर्व प्रयत्नांना भारताचा पाठिंबा अधोरेखित करत शांततेसाठीच्या सर्व प्रयत्नांना भारताचा कायम पाठिंबा असेल असंही मोदींनी स्पष्ट केलं.

'दहशतवादाबाबत भारताची भूमिका ठाम असून आमचा संदेश स्पष्ट आहे. दहशतवादाबाबत कोणतेही दुहेरी निकष नाही किंवा कोणतीही तडजोड नाही', असं मोदींनी मलेशियात बोलताना म्हटलं. दरम्यान, एआय आणि डिजिटल तंत्रज्ञानाबरोबरच आम्ही सेमीकंडक्टर्स, आरोग्य आणि अन्न सुरक्षेमध्ये भारत आणि मलेशियामधील सहकार्य आणखी वाढवण्याचा प्रयत्न करत आहोत, असं मोदींनी सांगितलं आहे.

पंतप्रधान मोदींनी काय म्हटलं?

'भारताला आज जगात विकासासाठी विश्र्वासार्ह भागीदार म्हणून पाहिले जाते. याचा प्रत्यय ब्रिटन, अमेरिका, युरोपीय महासंघासह अनेक देशांबरोबर भारताने केलेल्या व्यापार करारांतून येतो, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी मलेशियामध्ये केले. क्वालालंपूर येथे झालेल्या एका सामुदायिक कार्यक्रमात बोलताना मोदी म्हणाले की, भारतीय वंशाचे लोक भारत आणि मलेशिया यांच्यातील मैत्रीचा मजबूत दुवा आहेत.

यावेळी मोदींनी ब्रिटन, संयुक्त अरब अमिराती, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, ओमान, युरोपीय महासंघ आणि अमेरिका यांच्याशी झालेल्या करारांचा उल्लेख केला. भारत आणि मलेशिया एकमेकांना चांगले ओळखतात, कारण भारतीय भाषांमध्ये आणि मलय भाषेत अनेक सारखे शब्द आहेत, असेही मोदी म्हणाले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, २०२६ मधील हा त्यांचा पहिला परदेश दौरा असून मलेशियात येऊन आपल्याला खूप आनंद होत आहे. मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम हे पंतप्रधान होण्यापूर्वीपासूनच आपले मित्र असल्याचेही त्यांनी नमूद केले.

मलेशियातील तमिळ समाज विविध क्षेत्रांत समाजसेवा करत आहे. 'तमिळ समाज येथे अनेक शतकांपासून आहे. या समृद्ध इतिहासामुळेच आम्ही मलेया विद्यापीठात तिरुवल्लुवर चेअर स्थापन केली. आता सामायिक वारसा अधिक मजबूत करण्यासाठी तिरुवल्लुवर केंद्रही उभारणार आहोत,' असे त्यांनी सांगितले.

## 'नीट'ची परीक्षेसाठी ८ मार्चपर्यंत अर्ज करता येणार तर ३ मे रोजी परीक्षा

**तभा वृत्तसेवा**

**नागपूर, दि. ०८ फेब्रुवारी :** वैद्यकीय क्षेत्रात करिअर करणाऱ्या विद्यार्थ्यांना नीट परीक्षेची वाट असते. दहावीचे वर्ष पूर्ण होताच विद्यार्थी नीट परीक्षेच्या तयारीला सुरुवात करतात. दोन वर्षांच्या प्रचंड मेहनतीनंतर विद्यार्थी ही परीक्षा देतात.

दरवर्षी भारतात जवळपास पंधरा ते वीस लाख विद्यार्थी नीट परीक्षा देतात. यातून केवळ एका लाख जागांवरच प्रवेश दिला जातो. त्यामुळे नीट परीक्षेमध्ये प्रचंड स्पर्धा दिसून येते. वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोठी बातमी समोर आली आहे.

नीट यूजी २०२६ (National Eligibility cum Entrance Test, Undergraduate) ची अधिकृत अधिसूचना जाहीर झाली असून अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी अधिकृत संकेतस्थळ http://www.neet.nta.nic.in वर जाऊन ऑनलाइन अर्ज करायचा आहे. अर्ज करण्याची अंतिम तारीख ८ मार्च २०२६ निश्र्चित करण्यात आली आहे.

अर्ज करण्यासाठी उमेदवारांनी सर्वप्रथम अधिकृत वेबसाइटवर जाऊन रजीस्टेशन फॉर नीट यूजी २०२६ या लिंकवर क्लिक करावे. त्यानंतर स्वतः ची नोंदणी पूर्ण करून अर्ज भरावा. सर्व तपशील अचूक भरल्यानंतर अर्ज जमा करावा. अर्ज सादर केल्यानंतर ते पान डाउनलोड करून त्याची प्रिंटआउट भविष्यातील वापरासाठी जतन करून ठेवावी.अर्ज शुल्काबाबतही महत्त्वाची माहिती जाहीर करण्यात आली आहे. सामान्य प्रवर्गातील उमेदवारांसाठी अर्ज शुल्क १७०० रुपये आहे. ईडब्लूएस आणि ओबीसी उमेदवारांसाठी १६०० रुपये शुल्क आकारले जाईल. एससी, एससटी, पीडब्लूबीडी आणि तृतीयपंथी उमेदवारांसाठी अर्ज शुल्क १००० रुपये ठेवण्यात आले आहे. परदेशी उमेदवारांसाठी अर्ज शुल्क ९५०० रुपये आहे.

परीक्षेची तारीख देखील निश्र्चित करण्यात आली आहे. अधिकृत माहितीनुसार नीट यूजी २०२६ परीक्षा ३ मे २०२६ रोजी आयोजित केली जाणार आहे. परीक्षेची एकूण कालावधी १८० मिनिटे (तीन तास) असेल. परीक्षा दुपारी दोन वाजता सुरू होऊन सायंकाळी पाच वाजता समाप्त होईल. उमेदवारांनी सर्व सूचना काळजीपूर्वक वाचूनच अर्ज करावा.

## मुंबईत पाणी कपात

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०८ फेब्रुवारी :** मुंबईकरांसाठी फार महत्वाची बातमी समोर आली आहे. मंगळवार १० फेब्रुवारी रोजी मुंबईमधल्या अनेक ठिकाणी पाणी कपात होणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार वांद्रे येथील अनेक भागात पूर्णपणे पाणीपुरवठा बंद राहील, तर एम पूर्व आणि एम पश्चिम वॉर्डमधील काही भागात गुरुवार आणि शुक्रवारी ३० तासांचा पाणीपुरवठा बंद राहील. महानगरपालिकेने (इचउ) तातडीची दुरुस्ती आणि अपग्रेडची कामे हाती घेतल्याने ही पाणी कपात करण्यात आली आहे. कुर्ला पूर्वेकडील कुरेशी नगर झोपडपट्टीजवळील ९०० मिमी व्यासाच्या पाईपलाईनमधील गळती दूर करण्याचे काम महापालिका करत आहे. हे काम मंगळवारी सकाळी १० ते मध्यरात्रीपर्यंत चालणार आहे. या १४ तासांच्या कालावधीत, वांद्रे व्यापणाऱ्या एच वेस्ट वॉर्डच्या काही भागात पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहील; तर काही भागात कमी दाबाने पाणीपुरवठा होईल.

## महाशिवरात्रीला भीमाशंकर मंदिर बंद



**तभा वृत्तसेवा**

**पुणे, दि. ०८ फेब्रुवारी :** महाराष्ट्र जिल्ह्यातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले भीमाशंकर मंदिर या महिन्यात महाशिवरात्री उत्सवादरम्यान भाविकांसाठी बंद राहील, असे पुणे प्रशासनाने रविवारी (८ फेब्रुवारी) सांगितले. भीमाशंकर मंदिर परिसरात नव्या सभामंडपाचे बांधकाम सुरु आहे. तसेच पायऱ्यांचा मार्ग आणि परिसर सुशोभीकरणाचे कामेही एकावेळी सुरु आहेत. परिसरात मोठ्या प्रमाणात लोखंडी साहित्य, दगड आणि इतर सामग्री ठेवली आहेत. त्यामुळे कोणतीही दुर्घटना होऊ नये म्हणून पुणे प्रशासनाकडून मंदिर भाविकांसाठी बंद ठेवण्यात आले आहेत. स्थानिक प्रशासन आणि मंदिर समितीने संयुक्त बैठकीत हा निर्णय घेतला आहे.

## जातीनिहाय जनगणना: ओबीसींचा मोदी सरकारला इशारा

**तभा वृत्तसेवा**

**नागपूर, दि. ०८ फेब्रुवारी :** अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीसोबतच ओबीसींची जातनिहाय जनगणना करण्याचे केंद्र सरकारने जाहीर केले होते. यासंदर्भात २२ जानेवारीला राजपत्र जारी करीत जनगणनेसंबंधी ३३ सूची जाहीर करण्यात आल्या. बाराव्या क्रमांकावर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीचा उल्लेख आहे. मात्र ओबीसींचा उल्लेख नाही. यामुळे ओबीसी समाजामध्ये प्रचंड संतापाची लाट पसरली आहे. राष्ट्रीय ओबीसी महासंघ आणि अन्य संघटनांनी २३ मार्चला दिल्ली येथे ओबीसींच्या जातीनिहाय जनगणनेसह यूजीसीचा नवीन कायदा आदी विषयांवर देशव्यापी आंदोलन पुकारले आहे.

ओबीसी संघटना आणि विरोधकांच्या प्रचंड दबावानंतर केंद्र सरकारने मे २०२५ मध्ये जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला. केंद्रीय रेल्वे तथा माहिती आणि प्रसारणमंत्री अश्र्विनी वैष्णव यांनी ही माहिती दिली होती. ऑक्टोबर २०२६पासून जम्मू–काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये आणि त्यानंतर उर्वरित भागात मार्च २०२७पासून जनगणना सुरू करण्यात येणार असल्याचे १६ जून २०२५ ला स्पष्ट करण्यात आले होते. त्यानंतर जनगणना आयुक्तांनी यासंदर्भात एक अधिसूचना काढली होती. ७ जानेवारीला राजपत्र जारी केले गेले.

२२ जानेवारीला जनगणना करण्यासाठी ३३ सूची तयार करून राजपत्रात समाविष्ट करण्यात आल्या. यामध्ये घर क्रमांक, जनगणना घर क्रमांक, सामग्री, घराची स्थिती, कुटुंब क्रमांक, कुटुंबातील व्यक्तींची संख्या, कुटुंबप्रमुखाचे नाव, त्याचे लिंग, विवाहित दाम्पत्यांची संख्या, खोल्यांची संख्या, पिण्याच्या पाण्याचे मुख्य स्रोत, पेयजलाची उपलब्धता, वीज, शौचालय, रेडिओ, दूरचित्रवाहिनी, इंटरनेट, संगणक, भ्रमनध्वनी, चारचाकी वाहन, मुख्य धान्य अशा विविध बाबींचा समावेश केला आहे.

बाराव्या क्रमांकावर अनुसूचित जाती आणि जमातीचा उल्लेख करण्यात आला आहे. तर इतरांसाठी अन्य शब्दाचा प्रयोग करण्यात आला असून ओबीसींचा स्पष्ट उल्लेख नाही. त्यामुळे ओबीसींची स्वतंत्र जातीनिहाय जनगणना होणार की नाही, असा संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे सरकारला पुन्हा जागे करण्यासाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघ, बीसी वेल्फेअर असोसिएशन तेलंगाना, आंध्रप्रदेश आणि ओबीसी महासभा मध्यप्रदेश आणि देशातील सर्व ओबीसी संघटनांतर्फे देशव्यापी आंदोलन करण्यात येणार आहे. दिल्ली येथील जंतर- मंतर मैदानावर हे आंदोलन होणार आहे.

### प्रमुख मागण्या काय?

- सन २०२७ होणाऱ्या जातीनिहाय जनगणनेत ओबीसीचा स्पष्ट उल्लेख करावा.
- यूजीसीचा नवीन कायदा लागू करा.
- केंद्रात ओबीसींचे स्वतंत्र मंत्रालय स्थापन करा.
- क्रिमिलेअरची मर्यादा वाढवण्यात यावी.
- राजपत्रातील बाराव्या सूचीत अनुसूचित जाती आणि जमातीचा उल्लेख करताना इतरांसाठी अन्य शब्द वापरण्यात आला आहे. ओबीसी समाजाचा स्पष्ट उल्लेख कुठेही नाही. केंद्र सरकारला जागे करण्यासाठी दिल्ली येथे २३ मार्चला देशव्यापी आंदोलन केले जाणार आहे.

**–सचिन राजूरकर, महासचिव, राष्ट्रीय ओबीसी महासंघ.**

## थोडक्यात...

### पाक तुरुंगातील मच्छीमाराचा मृतदेह भारताच्या ताब्यात

**दिल्ली:** गेल्या महिन्यात पाकिस्तानी तुरुंगात मृतावस्थेत आढळलेल्या एका भारतीय मच्छिमाराचा मृतदेह भारतात आणण्यात आला. शनिवारी गुजरातमधील गिर सोमनाथ जिल्ह्यातील त्याच्या मूळ गावी मृतदेह पोहोचला तेव्हा त्याच्या कुटुंबियांना अश्रू अनावर झाले. दरम्यान पाकिस्तानी तुरुंगात भारतीय मच्छिमाराचा मृत्यू कसा झाला, असा प्रश्नही उपस्थित झाला आहे. जाफराबादचे मत्स्यव्यवसाय अधिकारी ओ.ए. मकरानी यांनी सांगितले की, जिल्ह्यातील उना तालुक्यातील चिखली गावातील रहिवासी भागाभाई बांभनिया यांचे १६ जानेवारी रोजी कराची तुरुंगात हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मकरानी म्हणाले की, त्यांचा मृतदेह वाघा सीमेवर (पंजाब) मत्स्यव्यवसाय विभागाच्या पथकाकडे सोपवण्यात आला.

### एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू

**रेवा :** मध्य प्रदेशमधील रेवा जिल्ह्यात ऑडी कारने एका दुचाकीला धडक दिली. या अपघातात एकाच कुटुंबातील तीन जणांचा मृत्यू झाला. ज्यांचा मृत्यू झाला ते सर्वजण लग्नाचं आमंत्रण देण्यासाठी एका ठिकाणी जात होते. मृतांची ओळख पटली आहे. भागवत विश्र्वकर्मा (५५), त्यांचा मुलगा शिवम आणि शीतल विश्र्वकर्मा अशी मृतांची नावं आहेत. भागवत यांच्या मोठ्या मुलाचे लग्न २४ फेब्रुवारी रोजी होणार होते. याच लग्नाचं आमंत्रण देण्यासाठी विश्र्वकर्मा कुटुंब एका ठिकाणी जात होतं त्यावेळी ऑडीने उडवलं. घरापासून फक्त २ किमी अंतरावर रेवा–प्रयागराज महामार्गावरील कोस्टा गावाजवळ अपघात झाला.

### बाबा वेंगाचे भाकीत चर्चेत

**बल्गेरिया :** भाकितांसाठी ओळखल्या जाणाऱ्या बल्गेरियन द्रष्ट्या बाबा वेंगा पुन्हा एकदा चर्चेत आल्या आहेत. भूतकाळातील काही घटनांशी त्यांच्या कथित भविष्यवाण्यांची सांगड घातली जात असल्याने, आजही अनेक जण त्यांच्या भाकितांकडे उत्सुकतेने पाहतात. सध्या वाढत्या सोने आणि चांदीच्या किमतींच्या पार्श्वभूमीवर बाबा वेंगांच्या एका जुन्या भाकितांचा पुन्हा उल्लेख केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २०१६ मध्ये करण्यात आलेल्या एका कथित भविष्यवाणीत जागतिक आर्थिक अस्थिरतेमुळे सोने, चांदी आणि तांबे यांसारख्या मौल्यवान धातूंमध्ये गुंतवणूक वाढू शकते, असा संकेत देण्यात आला होता. या अस्थिरतेचा परिणाम कागदी चलनांच्या विश्र्वासार्हतेवर होईल आणि लोक सुरक्षित पर्यायांकडे वळतील, असा दावा या भाकितांमध्ये करण्यात आला आहे.

### हरियाणात झुला कोसळला

**फरिदाबाद :** हरियाणाच्या फरिदाबादमध्ये सुरू असलेल्या प्रसिद्ध सूरजकुंड मेळ्यात एक मोठा अपघात घडला आहे. मेळ्यातील एक मोठा त्सुनामी नामक झुला अचानक कोसळल्याने मोठा अपघात होऊन यात अनेक लोक जखमी झाले आहे. दरम्यान या अपघातात झुल्याखाली अडकलेल्यांना वाचवण्यासाठी पोहोचलेल्या एका पोलीस निरीक्षकासह दहाहुन अधिक लोक जखमी झाले. जखमी निरीक्षकाला गंभीर दुखापत झाली असून त्यात त्यांचा मृत्यू झाल्याचीही माहिती आहे. पलवल येथे तैनात असलेले पोलीस निरीक्षक जगदीश प्रसाद यांचा बचाव कार्यादरम्यान मृत्यू झाला आहे. पोलिस उपायुक्त (डीसी) आयुष सिंह यांनी सांगितले की, या अपघातात एकूण १३ लोक जखमी झाले आहेत, त्यापैकी एकाचा मृत्यू झाला. संध्याकाळी ६.१५ च्या सुमारास हा झुला कोसळला असून अचानक घडलेल्या या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली.

### असे असावे नशीब ..!

**दिल्ली:** परिस्थिती कशीही असो, करण्याची इच्छा असेल तर सगळं होतं म्हणतात ते खरं आहे. बेंगळुरूच्या रमेश बाबू यांचे जीवन या म्हणीचे जिवंत उदाहरण आहे. ज्या वयात मुले शाळा आणि खेळात व्यस्त असतात, त्या वयात रमेश दूध आणि वर्तमानपत्रे विकून कुटुंबाचा आधार बनले. आज, हेच रमेश बाबू रोल्स–रॉइस, मेबॅक, मर्सिडीज–बेंझ आणि बीएमडब्ल्यूसह ४०० हून अधिक लक्झरी कारचे मालक आहेत. रमेश बाबूंचा जन्म एका सामान्य कुटुंबात झाला. वडिलांच्या निधनानंतर कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची झाली. वयाच्या १३ व्या वर्षी त्यांनी वर्तमानपत्रे आणि दूध पोहोचवण्यास सुरुवात केली आणि वडिलांचे छोटेसे न्हावी दुकानही (सलून) सांभाळले. या परिस्थितीमुळे ते वेळेआधीच प्रौढ झाले आणि त्यांना कठोर परिश्रमाचा खरा अर्थ समजला.



तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### २० फेब्रुवारीला 'जब्राट' प्रेक्षकांच्या भेटीला

**छत्रपती संभाजीनगर :** अभिनेत्री वनिता खरात हिचा 'रॅपर' अंदाज आगामी 'जब्राट' या मराठी चित्रपटातून प्रेक्षकांसमोर येत आहे. तारा करमणूक निर्मित व प्रगती कोळगे दिग्दर्शित हा चित्रपट २० फेब्रुवारीला प्रदर्शित होणार आहे. लोक काय म्हणतील सोचने का नाय, मनासारखं जगायचं डरने का नाय असा बिनधास्त जीवनदृष्टिकोन मांडणारे रॅप गीत तरुणांच्या कॉलेज विश्र्वातील मैत्री, धम्माल आणि भावबंध उलगडते. गीत लेखन प्रगती कोळगे यांचे असून राजनंदिनी मगर, स्वाती शिंदे, शिवानी देशपांडे यांनी गायन केले आहे. संगीत डॉ. जयभीम शिंदे यांचे आहे. निर्माते अनिल अरोरा, गोविंद मोदी व प्रगती कोळगे आहेत. छायांकन अनिकेत खंडागळे यांचे आहे.

### नवीन शैक्षणिक धोरणाशी सुसंगत 'सेवाफेस्ट २०२६'चे आयोजन

**पुणे :**विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सामाजिक सहभाग व क्रेडिट-आधारित उपक्रमांना प्राधान्य देणाऱ्या नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या पार्श्र्वभूमीवर सेवा सहयोग फाउंडेशनतर्फे सेवाफेस्ट २०२६ या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४.३० ते ८ या वेळेत सिंहगड रोड येथील कलाग्राम येथे हा कार्यक्रम होणार आहे.

एम.ई.एस वरिष्ठ महाविद्यालय, फर्ग्युसन महाविद्यालय यांसह विविध शैक्षणिक संस्थांनी सेवा सहयोगसोबत सामंजस्य करार करून विद्यार्थ्यांना स्वयंसेवक तास पूर्ण करण्यासाठी सामाजिक उपक्रमांशी जोडले आहे. शिक्षण, पर्यावरण, वस्ती विकास, शालेय साहित्य वाटप, शिष्यवृत्ती, आरोग्य जनजागृती, व्यक्तिमत्त्व विकास, दिव्यांग मुलांसाठी विशेष केंद्रे, तसेच महिला स्वावलंबनासाठी समुत्कर्ष योजना राबवली जाते.

निर्मल वारी, युथ फॉर सेवा आणि मॅजिक गुल्लक यांसारख्या उपक्रमांना व्यापक प्रतिसाद मिळत आहे. कोविड काळातील संस्थेचे कार्यही उल्लेखनीय ठरले. सेवाफेस्टच्या माध्यमातून शैक्षणिक संस्था, विद्यार्थी, स्वयंसेवी संघटना व नागरिकांना एकत्र आणून स्वयंसेवेची संस्कृती बळकट करण्याचा उद्देश आहे. सोशल क्रेडिट मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### माता रमाई आंबेडकर जयंती उत्साहात साजरी




**छत्रपती संभाजीनगर :** येथील संत तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे हायस्कूल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर सिडको येथे माता रमाई भिमराव आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रकाश सोनवणे व सचिव श्रीमती संगिताताई खिल्लारे यांच्या हस्ते प्रतिमापूजन व पुष्पहार अर्पण करण्यात आले. शिक्षकांनीही पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली. अध्यक्ष प्रकाश सोनवणे यांनी माता रमाईंच्या त्यागमय जीवनकार्याचा प्रेरणादायी आढावा मांडला.

विद्यार्थ्यांनी माता रमाईंची वेशभूषा साकारत सांस्कृतिक सादरीकरण केले; गीतावर सादर केलेल्या नृत्याला उपस्थितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती वैशाली बागुल व रत्नमाला घोरपडे यांनी केले. आयोजनासाठी साहेबराव शिंदे, विजय पाटील, नाझिमा खाँन, सुनीता शेजवळ यांनी सहकार्य केले. आभारप्रदर्शन श्रीमती एस. जी. खिल्लारे यांनी केले.

### राजाबजार जैन मंदिराचा ४७ वा वर्धापन दिन उत्साहात



**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगरातील खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्र्वनाथ मंदिर, राजाबजार येथे भगवान शांतीनाथ प्राणप्रतिष्ठेच्या ४७ व्या वर्धापन दिनानिमित्त ९ फेब्रुवारी रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मुनिश्री प्रभावसागरजी महाराज यांच्या सानिध्यात होणाऱ्या सोहळ्यास सकल जैन समाजाचे अध्यक्ष राजेंद्रबाबुजी दर्डा अध्यक्षस्थानी राहतील, तर ना. अतुल सावे प्रमुख अतिथी असतील. नवनिर्वाचित महापौर समीर राजुरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ व नगरसेवकांचा सत्कार होईल.

सकाळी ७.१५ वाजता धर्मध्वजारोहण, ७.३० वाजता रूपाली रावका यांच्या संगीतात पंचामृत अभिषेक, ८.१५ वाजता प्रवचन, ९ वाजता शांतीविधान होईल. महाप्रसाद सुभाषचंद-शकुंतला, धिरज-सपना-मयूर-पूजा-चेतन-चिराग पाटणी परिवार, धिरज पाटणी मित्रमंडळ व राजेंद्रकुमार-मोहितकुमार पहाडे परिवारातर्फे असेल. संध्याकाळी नमोकार भक्ती मंडळाची महाआरती होईल. माहिती महावीर पाटणी, प्रकाश अजमेरा, नरेंद्र अजमेरा, पियुष कासलीवाल यांनी दिली. १९७९ मध्ये आचार्य सिद्धसेनसागरजी महाराजांच्या सानिध्यात प्राणप्रतिष्ठा झाली होती.

# समाज संघटित व गुणसंपन्न झाल्याशिवाय राष्ट्रपरिवर्तन अशक्य : डॉ. मोहन भागवत

**तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी**

**मुंबई, दि. ०८ फेब्रुवारी :** समाज हा सर्व व्यवस्थांचा केंद्रबिंदू असून नेतृत्व, धोरण, पक्ष, सत्ता किंवा विचारप्रवाह हे सहाय्यक घटक आहेत. समाज जागरूक, संघटित, शिस्तबद्ध आणि गुणवान झाला तरच देशात खरे परिवर्तन घडेल, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले.

**संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त 'संघ प्रवासाची १०० वर्षे :** नवे क्षितिज' या दोन दिवसीय संवाद कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात नेहरू सेंटर, वरळी येथे ९०० हून अधिक विविध क्षेत्रांतील मान्यवरांना संबोधित करताना ते बोलत होते. व्यासपीठावर पश्र्चिम क्षेत्र संघचालक डॉ. जयंतीभाई भाडेसीया, कोकण प्रांत संघचालक अर्जुन चांदेकर व मुंबई महानगर संघचालक सुरेश भगेरिया उपस्थित होते.




संघाबद्दल असलेल्या गैरसमजांना उत्तर देताना त्यांनी स्पष्ट केले की, संचलन, लाठी-काठी, गीत किंवा स्वयंसेवकांचा सार्वजनिक सहभाग यावरून संघाचे स्वरूप ठरवणे चुकीचे आहे. संघ समजून घ्यायचा असेल तर शाखेचा अनुभव, कार्यकर्त्यांचे जीवन, त्यांचे कुटुंब व समाजकार्य यांचे सूक्ष्म निरीक्षण आवश्यक आहे. संघ सत्ता, प्रसिद्धी किंवा स्पर्धा यासाठी कार्य करत नसून राष्ट्रहित हेच ध्येय आहे.

संघ स्थापनेची पार्श्वभूमी सांगताना त्यांनी नमूद केले की, समाजातील विस्कळीतपणा, शिस्तअभाव, स्वार्थी प्रवृत्ती आणि गुणहीनता यामुळे स्वातंत्र्य टिकत नाही, हा इतिहासाचा धडा आहे. समाज गुणवान, संघटित आणि अनुशासित झाल्याशिवाय स्वातंत्र्य सुरक्षित राहू शकत नाही, या विचारातून डॉ. हेडगेवारांनी १९२५ मध्ये संघाची स्थापना केली.

दैनंदिन आचरणात सामाजिक समरसता, पर्यावरण संवर्धन, स्वबोध, कुटुंब प्रबोधन आणि संविधानाधारित नागरी कर्तव्य पालन या पाच बाबींवर भर देण्याचे त्यांनी आवाहन केले. देशातील रोजगारवाढ लक्षात घेऊन स्वदेशी वस्तूंचा वापर करण्याचा विचार प्रत्येकाने करावा, असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमात समाजातील विविध क्षेत्रांचे प्रतिनिधित्व करणारे उद्योगपती, चित्रपटसृष्टीतील मान्यवर, डॉक्टर, शास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, कायदेपंडित, क्रीडापटू, माध्यम प्रतिनिधी, सामाजिक संस्थांचे सदस्य, धर्मगुरू, शिक्षणतज्ज्ञ, लेखक, सोशल मीडिया प्रभावक तसेच जाहिरात क्षेत्रातील व्यावसायिक सहभागी झाले. त्यामध्ये राधाकिशन दमानी, अभिनेता सलमान खान, रणबीर कपूर, हेमा मालिनी, सज्जन जिंदल, दीपक पारेख, अजय पिरामल, सुभाष चंद्रा, रोनी स्क्रूवाला, विनित जैन, सुभाष चंद्रा, नितेश तिवारी, मोहित सुरी, रमेश तौरानी, बोनी कपूर, ओम राऊत, ज्येष्ठ दिग्दर्शक सुभाष घई, पार्श्र्वगायक अदनान सामी, दिग्दर्शक विपूल शहा, इंदर कुमार, प्रसाद ओक, आयआयटी मुंबईचे शिरीष केदारे, स्वामी स्वरूपानंद, अक्षत गुप्ता, अभिनेत्री अश्र्विनी भावे, ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल, ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर, संस्कार भारती कोकण प्रांत अध्यक्ष अभिनेते सुनील बर्वे, गायक अदनान सामी, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी, एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव, इस्त्रायल-इटलीच्या राजदूतावासाचे अधिकारी, भारतातील सिंधी गुरुद्वारांचे प्रमुख जसकीरतजी भाईसाहेब, अमर सिंहजी कल्सी नाखुदा, राम सिंह राठोड, कॅबिनेट मंत्री नितेश राणे, खासदार व ज्येष्ठ अधिवक्ता उज्ज्वल निकम, आदी मान्यवरांची उपस्थिती होती. शताब्दी वर्षात संपर्क, सेवा व शाखा विस्तार उपक्रमांना अधिक गती देण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## द रिटर्न ऑफ द आर्मी मॅनला प्रतिसाद



**छत्रपती संभाजीनगर, दि. ०८ फेब्रुवारी :** छत्रपती संभाजीनगर येथे प्रदर्शित झालेल्या द रिटर्न ऑफ द आर्मी मॅन चित्रपटाने ओपनिंग वीकेंडमध्ये मजबूत प्रेक्षक एंगेजमेंट नोंदवले आहे.

दिग्दर्शक बाबू भट यांच्या क्रिएटिव्ह लीडरशिपखाली साकारलेला हा देशभक्तीप्रधान ॲक्शन ड्रामा प्रेक्षकांकडून पॉझिटिव्ह वर्ड-ऑफ-माउथ मिळवत आहे. अप्सरा चित्रपटगृहात झालेल्या प्रमोशनल ॲक्टिव्हेशनमध्ये नगरसेवक अफसर खान, डॉ. जीवन राजपूत व कलाकारांची उपस्थिती दिसली.

पुलवामा हल्ल्याच्या पार्श्वभूमीवरील कथानक, लष्करी प्रतिसाद आणि भावनिक स्टोरीटेलिंग हा चित्रपटाचा मुख्य कंटेंट ड्रायव्हर ठरत आहे. निर्माते व अभिनेता नय्युम खान यांच्यासह गोविंद नामदेव, मनोज जोशी आदींची स्टार कास्ट चित्रपटाच्या व्हॅल्यू प्रपोजिशनला बळकटी देते.

## आयुष व सीजीएचएस वेलनेस सेंटरचे उद्घाटन

## सर्वांगीण आरोग्य सेवेला चालना

### केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०८ फेब्रुवारी :** सीजीएचएस अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या आयुष वेलनेस सेंटरच्या माध्यमातून नागरिकांना आयुर्वेद व पारंपरिक उपचार पद्धतींचा लाभ मिळणार असून, हे केंद्र सर्वांगीण आरोग्य सेवेच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे, असे प्रतिपादन आयुष मंत्रालयाचे केंद्रीय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव यांनी केले.

केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयांतर्गत आयुष व सीजीएचएस वेलनेस सेंटरच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार बाबुराव कोहळीकर, केंद्रीय वस्तू व सेवा कर तथा केंद्रीय उत्पादन शुल्क, कार्यालयाचे आयुक्त प्रदिप गुरुमुर्ती, आरोग्य विभागाचे सहायक संचालक दयानंद मोतीपवळे, मनपाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. पारस मंडलेचा, शिक्षण विभागाचे उपायुक्त डॉ. अंकुश पांढरे, डॉ. सी. पी. चौधरी उपस्थित होते.

केंद्रीय राज्यमंत्री श्री. जाधव म्हणाले, सन २०२३ मध्ये तत्कालीन केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मनसुख मांडविया यांच्या हस्ते सीजीएचएस केंद्राचे आभासी पद्धतीने उद्घाटन करण्यात आले होते. त्यानंतर येथे एलोपॅथीसह आधुनिक उपचार सुविधा सुरू करण्यात आल्या. ही शहराच्या आरोग्य व्यवस्थेसाठी महत्त्वाची सुरुवात ठरली. नागरिकांच्या वाढत्या अपेक्षा आणि आरोग्यविषयक गरजा लक्षात घेऊन सन २०२४ मध्ये सीजीएचएस अंतर्गत आयुष विभाग सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या निर्णयाची आज प्रत्यक्ष अंमलबजावणी होत असल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले.

आयुर्वेद ही केवळ उपचार पद्धती नसून ती एक संपूर्ण जीवनशैली आहे, असे सांगून त्यांनी योग, युनानी, सिद्ध व होमिओपथी या पारंपरिक उपचार पद्धतींचे महत्त्व अधोरेखित केले. बदलत्या जीवनशैलीमुळे मधुमेह, उच्च रक्तदाब, तणाव, निद्रानाश यांसारख्या आजारांचे प्रमाण वाढत असून, आयुष पद्धतीद्वारे त्यावर प्रभावी नियंत्रण मिळवता येते, असेही त्यांनी नमूद केले. या वेलनेस सेंटरमुळे नागरिकांची नैसर्गिक रोगप्रतिकारक शक्ती वाढेल, दीर्घकालीन आरोग्य सुधारेल आणि उपचार खर्चातही बचत होईल, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.

केंद्र सरकार आजारांवरील उपचारांबरोबरच प्रतिबंधात्मक आरोग्य सेवेला प्राधान्य देत असून, उपचारापेक्षा प्रतिबंध या तत्त्वावर काम करत आहे. संतुलित आहार, नियमित व्यायाम, योग व ध्यान यांचा अवलंब करण्याचे आवाहनही त्यांनी केले. आयुष मंत्रालयाच्या माध्यमातून देशभरात जनजागृती मोहिमा, आरोग्य शिबिरे व प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जात असून, पारंपरिक उपचार पद्धतींचा वैज्ञानिक व सुरक्षित वापर वाढविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे केंद्रीय राज्यमंत्री श्री. जाधव यांनी सांगितले.

## बिडकीन जिल्हा परिषद व पंचायत समिती गटामध्ये ८० टक्के मतदान

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि. ०८ फेब्रुवारी :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील जिल्हा परिषद व पंचायत समिती गटामध्ये मतदान शांततेत पार पडले बिडकीन येथे ८० टक्के मतदान झाले.

बिडकीन येथील एका जिल्हा परिषद शाळेच्या केंद्रावर साडेपाच वाजता मतदारांची रांग पाहायला मिळाली तेथे सहा बाजेच्या सुमारास मतदान पार पडले तर बंगला तांडा या मतदान केंद्रावर साडेसात वाजेपर्यंत मतदान चालू होते विशेष म्हणजे या ठिकाणी ग्रामस्थांनी बहिष्कार टाकण्याची घोषणा केली होती.

मात्र पैठण आमदार विलास भुमरे यांनी या ठिकाणी जाऊन तुमचे सर्व प्रश्र्न सोडवतो असे आश्वासित करून मतदान करण्याचे आवाहन



केले होते तेव्हा ग्रामस्थांनी मतदानाचा निर्णय घेतला.व बिडकीन जिल्हा परिषद गटातील पंचायत समिती गण निलजगाव येथे एक अनोखा आणि प्रेरणादायी सोहळा पाहायला मिळाला या ठिकाणी एक लग्न सोहळ्या आधी लोकशाहीचा सोहळा आधी नवीन वधू वैष्णवी दत्तात्रय मोगल रा निलजगाव यांनी मतदान केंद्रावर जाऊन मतदान करुन आपला हक्क बजावला, बिडकीन येथील मतदान केंद्रावर बिडकीन पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवून मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली.आज दि ९ फेब्रुवारी रोजी दुपारी पर्यंत निकाल लागून गुलाल कोणत्या उमेदवाराच्या अंगावरती पडणार हे दिसून येणार आहे, याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे,

## कु. नेहा नंदकिशोर गुजर निधन

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि. ०८ फेब्रुवारी :** कुमारी. नेहा नंदकिशोर गुजर (वय २६ रा. जगदंबा नगर बिडकीन) हिचे दिर्घ आजाराने उपचारादरम्यान आज दि ८ फेब्रुवारी रविवार रोजी दुपारी २ वाजता दुःखत निधन झाले असून तिच्या पार्थिवर बिडकीन येथील शेकटा फाटा अमरधाम स्मशानभूमीत सायंकाळी ७ वाजता करण्यात आले तिच्या पश्चात आई, वडील, दोन भाऊ आहेत.



# छत्रपती संभाजीनगरमध्ये 'सीएसएनपेक्स २०२६' : २२ वर्षांनंतर टपाल तिकिटांचे ऐतिहासिक प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०८ फेब्रुवारी :** भारतीय टपाल विभागाच्या पुढाकारातून छत्रपती संभाजीनगर येथे 'सीएसएनपेक्स २०२६' या दोन दिवसीय टपाल तिकिटांच्या प्रदर्शनाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. एन-१० सिडको येथील कैलाश शिल्प सांस्कृतिक सभागृहात पार पडलेला हा उपक्रम फिलेटेली क्षेत्रातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला. तब्बल २२ वर्षांनंतर आयोजित या प्रदर्शनात १८४० साली इंग्लंडमध्ये जारी झालेले जगातील पहिले 'पेनी ब्लॅक' तिकीट ते २०२५ पर्यंतचा टपाल तिकिटांचा उत्क्रांती प्रवास संरचित पद्धतीने मांडण्यात आला. 'फिलेटेली' हा फ्रेंच शब्द असून टपाल तिकिटांचा संग्रह हा त्याचा अर्थ; बेल्जियमचे बैपटीस फिलीप मोएन्स हे पहिले फिलेटेलिस्ट मानले जातात.

महाराष्ट्र-गोवा परिमंडळाचे मुख्य पोस्टमास्टर जनरल अमिताभ सिंह यांच्या हस्ते उद्घाटन झाले. त्यांनी छंद विकासातून ज्ञानवृद्धी आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असे अधोरेखित केले. पोस्टल सर्विसेस संचालक डॉ. अजिंक्य काळे यांनी उदाहरणांसह फिलेटेलीचे शैक्षणिक व सांस्कृतिक मूल्य स्पष्ट केले, तर प्रवर अधीक्षक जी. हरिप्रसाद यांनी अशा प्रदर्शनांतून 'डिजिटल डीटॉक्स'ला प्रोत्साहन मिळते, असे नमूद केले.

राज्यातील ७२ संग्राहकांनी १२० फ्रेम्स सादर केल्या. शहरातील ५० शाळांमधील हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. प्रश्र्नमंजुषा, चित्रकला व निबंध स्पर्धांचे आयोजन करून विजेत्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली. जैन महासभा, एलोरा लेणी आणि बीबी का मकबरा या विशेष रद्दछाप पोस्टकार्ड व पाकिटांचे डिझाइन सुवर्णपदक विजेते दिपक मोदी यांनी केले. किशोर चारभे यांनी रौप्य व कांस्य पदके पटकावली.

ज्येष्ठ कलावंत सुधीर कोर्टीकर यांच्या गांधी तिकिट संग्रहास रौप्य, तर स्वप्निल कोर्टीकर यांच्या दुर्मिळ प्राणी विषयक संग्रहास कांस्य सन्मान मिळाला. आयोजनात डॉ. अजिंक्य काळे, जी. हरिप्रसाद, सुरेश एल. बनसोडे, मासूम पटेल, निवृत्ती तोडकर, सुनील मामीदवार, सुनील कोल्हे, संजय पाटील, प्रकाश अहिरे, राज बेरवाल, योगेश इंगळे यांचे ऑपरेशनल योगदान महत्त्वपूर्ण ठरले. सूत्रसंचालन अंकिता कुलकर्णी, श्रद्धा वानखेडे, सायली दहिवाल यांनी केले; स्वागत



रांगोळ्या स्वाती जागीरदार, दिपाली जाधव, उमादेवी बेंडे, दिपाली टोके यांनी साकारल्या. आभारप्रदर्शन मासूम पटेल यांनी केले. प्रदर्शनाला टपाल तिकीटप्रेमी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दोन दुचाकींच्या भीषण अपघातात एकाचा जागीच मृत्यू, एकाची प्रकृती चिंताजनक

**शांतीलाल शर्मा**

**पालम,/प्रतिनिधी:** लोकशाहीचा उत्सव साजरा करण्यासाठी उत्साहाने निघालेल्या एका इसमावर काळाने घाला घातला आहे. आबासाहेब कोंडीबा बोंमशेटे (वय ५६ वर्ष रा.चोरवड) हे मतदाना साठी आपल्या गावाकडे शनिवार ७ फेब्रुवारी जात होते. पालम जवळील सरफराजपूर फाट्या जवळ दोन दुचाकींची समोरासमोर भीषण धडक झाली. या अपघातात आबासाहेब बोमशेटे यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला असून अन्य दोन तरुण गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, शनिवार ७ फेब्रुवारी रोजी सकाळी १०,१५ च्या सुमारास हा अपघात घडला. मतदानाला गावी जात होते अपघात बोंमशेटे हे पालम तालुक्यातील चोरवड येथे मतदानासाठी जात होते त्यांच्या दुचाकीला समोरून येणाऱ्या भरधाव दुचाकीने जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, दोन्ही गाड्यांचा चक्काचूर झाला आणि आबासाहेब बोमसेटे यांचा जागीच प्राण गेला. या अपघातात दुसऱ्या दुचाकीवरील सुभाष (दोघे रा. सारंगी, ता. पूर्णा) हे गंभीर जखमी झाले आहेत. हे दोन्ही युवक गंगाखेड येथील एका लग्न समारंभासाठी जात होते. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तातडीने पुढील उपचारासाठी नांदेड येथील शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलवण्यात आले आहे. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे



समजते. या घटनेमुळे चोरवड आणि सारंगी गावांत शोककळा पसरली आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे. याघटनेनंतर परिसरातनागरिकांचीगर्दीहोती.

## संक्षिप्त वृत्त...

### श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर महाविद्यालयास सुनील रावळे यांच्याकडून ग्रंथ भेट

**जिंतूर,/प्रतिनिधी:** येथील श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर महाविद्यालयास श्री. सुनील सीताराम रावळे यांनी एकून चार हजार एकशे ऐंशी रुपयांचे ग्रंथ भेट दिले. श्री रावळे हे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे परीक्षा विभाग (वाणिज्य) येथे सहाय्यक अधीक्षक पदावर कार्यरत आहेत. क्रमिक अभ्यासक्रम, सामाजिक चळवळ तसेच ललित साहित्याचा समावेश असलेली ही पुस्तके श्री. रावळे यांनी ग्रंथपाल श्री. विनोद भवाळे यांना विद्यापीठ परिसरात सुपूर्त केली.

माणसाच्या जडणघडणीत ग्रंथाचा वाटा फार मोठा असतो. सर्वांना शैक्षणिक, सामाजिक चळवळीची ओळख व्हावी.थोर महापुरुषांचे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावेत व त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास साधला जावा ,हाच उद्देश या ग्रंथ भेटीमागचा असल्याचे श्री.रावळे यांनी यावेळी सांगितले. यापूर्वीही त्यांनी स्वखर्चाने बऱ्याच महाविद्यालयांना अशा प्रकारचे ग्रंथ भेट दिले आहेत.

यावेळी ग्रंथ भेट देताना त्यांच्यासोबत मा. व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या तथा संचालिका डॉ. एस. एस. मोकाने, अधीक्षक श्री. गणेश कोंडेकर, श्री. अनिल कळसकर, श्री. आशिष डहाळे,श्री. सुनील ढाले, श्री. संदीप कांबळे, श्री. विनायक जाधव, श्री. बळीराम चित्ते, श्री. बालाजी डुकरे, श्री. गजानन हंबर्डे,श्री. संतोष धामणे, श्री.आनंदा हंबर्डे ,श्री. अशोक जटाळे, श्री. वाघमारे ही विद्यापीठातील मंडळी उपस्थित होती. संस्था सचिव सौ. मीनाताई रामप्रसादजी बोर्डीकर यांनी श्री. रावळे यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे विशेष कौतुक करून पुढील वाटचालीसाठी त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.

### परभणीत हजरत सय्यद शाह तुराबुल हक साहेब (रहे.) उरुसास प्रारंभ



**परभणी,/प्रतिनिधी:** परभणी शहरातील प्रसिध्द हजरत सय्यद शाह तुराबुल हक साहेब (रहे.) यांचा वार्षिक उरुस आजपासून उत्साहात सुरू झाला आहे. जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, तहसीलदार डॉ. संदीप राजापुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रथेप्रमाणे धार्मिक विधी पार पाडत उरुसाला प्रारंभ झाला. संदलमध्ये स्वतः जिल्हाधिकारी श्री. चव्हाण यांनी तबक डोक्यावर घेऊन संदलला रीतसर सुरुवात केली. उरुसाच्या काळात भाविकांची मोठी गर्दी होत असून भाविकांच्या सुविधा व सुरक्षेसाठी प्रशासनाकडून आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

### झिरो फाटा येथील लूट व मारहाण प्रकरणातील आरोपी मुद्देमालासह ताब्यात

**परभणी,/प्रतिनिधी:** पूर्णा पोलिस ठाणे हद्दीतील झिरो फाटा परिसरात हत्यार दाखवून पैसे, दागिने आणि मोटरसायकल काढून घेत फिर्यादीस मारहाण केल्याप्रकरणी दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यातील आरोपींना पूर्णा पोलिस आणि स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने संयुक्त कारवाई करत २४ तासांच्या आत मुद्देमालासह आरोपीस शनिवारी(दि. ३१) ताब्यात घेतले.

मंगळवारी झिरो फाटा परिसरात आरोपीने हत्याराच्या जोरावर प्रवाशांकडून नगद पैसे, दागिने आणि मोटरसायकल काढून घेत मारहाण केली होती. या प्रकरणी पूर्णा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्रकरणाची पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी गंभीर दखल घेऊन स्थानिक गुन्हे शाखा आणि पूर्णा पोलिसांतील अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करून आरोपींचा तात्काळ शोध घेण्याबाबत आदेश दिले होते. यावरून अधिकारी व अंमलदारांचे पथक तयार करून रवाना करण्यात आले होते. दरम्यान, गुन्ह्यातील आरोपी हे किनगाव येथे असल्याबाबत गोपनीय माहिती मिळाल्यावरून पथकाने तात्काळ कारवाई केली.



# आज गुलाल कोणाचा उधळणार विजयी उमेदवारांसाठी कार्यकर्ते सज्ज

**पालम,/प्रतिनिधी:-** जि प व पंचायत सामितीच्या मतदानाचा उत्सव मतदारांनी केले सकाळ पासुनच मतदारांनी मतदान करण्यासाठी मतदान केंद्रावर रागा लावल्या होत्या या वेळी महिला व नवमतदाराचा सहभाग मोठ्या प्रमाणावर दिसून आला. मतदान केंद्रावर चोख कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



मतदान केंद्रावर कोठे ही अनुसुचिन प्रकार घडला नाही यामुळे सुरळीत मतदान पार पडले मतदान प्रक्रिया सायकाळ पर्यंत चालू होती मतदान पूर्ण झाल्या नंतर रात्री उशिरा पर्यंत उमेदवारानी आकडेवारी चचपाळणी सुरु केली.तसेच आज आपला गुलाल नक्की उधळणार ही आपेक्षा मतदार बंधू आपल्या उमेदवाराची करत आहेत तसेच आपला उमेदवार जास्त मतांनी विजयी होणार असे अपेक्षित बोलल्या जात होते. आज होणाऱ्या मतमोजणीकडे सर्वांचेच लक्ष लागून राहिले आहे यामुळे कभी खुशी कभी गम काही कार्यकर्त्यामध्ये दिसनार आहे. काल मतदारांचा आनंद उत्सव झाला परंतु आज कोणता उमेदवाराचा आनंद उत्सव राहील याकडे सगळ्यांचे लक्ष लागून राहिले आहे प्रत्येक मतदारकेंद्रावर पालम पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शेषेराव खटाणे यांनी प्रत्येक मतदान केंद्रावर धावती भेट दिली व सुरळीत मतदान व्हावे यासाठी मतदान केंद्रावर पोलिस कर्मचाऱ्यांना सुचना दिल्या या वेळी काटेकोर बदोबस्त ठेवल्याने कुठेहि आनुचित प्रकार घडला नाही.

## जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत तालुक्यातील चांगेफळ येथे नवदांपत्य वधू-वराने मतदानाचा हक्क बजावला

**पूर्णा,/प्रतिनिधी-** पूर्णा तालुक्यातील जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी एकूण ७५.२५ टक्के मतदान झाले असून तालुक्यात ९२ हजार २८० मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे आज सोमवारी सकाळी दहा वाजता पूर्णा तहसील कार्यालयात या निवडणुकीची मतमोजणी होणार असल्याची माहिती सहाय्यक निर्वाचन अधिकारी माधवराव बोथीकर यांनी सांगितले पूर्णा तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या सहा गटासाठी व पंचायत समितीच्या बारा गणाच्या निवडणूक साठी काल शनिवारी मतदान झाले होते तालुक्यात एकूण ९२ हजार २८० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असून मतदानाची टक्केवारी ७५.२५ टक्के एवढी आली आहे तालुक्यातील एकूण ८४ उमेदवाराचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले असून सोमवारी सकाळी दहा वाजता पूर्णा तहसील कार्यालयात प्रत्यक्ष मतमोजणी होणार आहे यासाठी १४ टेबलवर मतमोजणी होणार आहे मतमोजणीसाठी संपूर्ण तयारी प्रशासनावतीने करण्यात आली असून निर्वाचन अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी प्रतिभा गोरे यांच्या प्रमुख उपस्थित मतमोजणी केली जाणार आहे.



## परिसरातील सर्व उपलब्ध साधनांचा अभ्यास महत्त्वाचा

### नगराध्यक्ष परमेश्वर कदम यांचे प्रतिपादन : वरपुडकर महाविद्यालयात औषधी वनस्पती प्रदर्शनाचे उद्घाटन

**सोनपेठ,/प्रतिनिधी :** शिक्षण हे केवळ पुस्तकातच नसून आपल्या अवती-भवती असणाऱ्या अनेक बाबींबद्दल आपण माहिती ठेवली पाहिजे, स्थानिक अभ्यासही महत्त्वाचा असतो, आपल्या परिसरातील सर्व उपलब्ध साधनांचा अभ्यास अतिशय महत्त्वाचा असतो, असे मत नगराध्यक्ष परमेश्वरराव कदम यांनी व्यक्त केले.

ते वरपुडकर महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभाग आयोजित औषधी वनस्पती प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी गुरूवारी बोलत होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ. वसंत सातपुते, रामेश्वर कदम, संपादक प्रशांत बिराजदार, सुभाष सावंत, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. मुकुंदराज पाटील यांची उपस्थिती होती. औषधी वनस्पती प्रदर्शनामध्ये विविध शाळातील जवळपास १३०० व्यक्तींनी भेट दिली, परिसरातील ७० औषधी वनस्पतींची व त्याच्या औषधी गुणधर्माची माहिती माहिती देण्यात आली.

पुढे बोलतांना नगराध्यक्ष परमेश्वर कदम महणाले की, आपल्या परिसरात निसर्गाने अनेक उपयुक्त स्त्रोत तयार करून ठेवलेले आहेत, शेत, माळरानावर असंख्य औषधी वनस्पती झाडे आढळतात परंतु त्याची आपण माहिती प्राप्त करून घेणे गरजेचे आहे, निसर्गाने परिसरात उपलब्ध करून दिलेल्या या साधनांचा आपण अभ्यास करून त्याचा मानवी जीवनासाठी उपयोग केला पाहिजे, असे मत व्यक्त केले.

प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी प्रा. पवनकुमार पवार, डॉ. संतोष रणखांब, डॉ. संदीप कुमार देवराये, डॉ. विकास रागोले, प्रा. मोनाली कदम, प्रा. अनिता जिंतूरकर, प्रा. अजय जाधव, प्रा. रोहित निरस, प्रा. रघुजी मांडे आदींनी परिश्रम घेतले.

### भरधाव बसच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

**जिंतूर,/प्रतिनिधी :** जिंतूर-औंढा महामार्गावरील मानधनी पाटीजवळ भरधाव वेगाने जाणाऱ्या एसटी बसने पायी चालणाऱ्या इसमाला चिरडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बुधवार दि. ५ फेब्रुवारी रोजी दुपारी सुमारे १ वाजताच्या सुमारास घडली.घटनास्थळी उपस्थित ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, एमएच-२० बीएल-१२८५ क्रमांकाची एसटी बस जिंतूरहून मानधनी मार्गे परभणीकडे जात होती. मानधनी पाटीजवळ चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने रस्त्याने पायी चालणाऱ्या ज्ञानेश्वर गंगाधर तळेकर (वय ५५, रा. मानधनी) यांना बसने जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात तळेकर यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते नागेश आकोलकर यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. जखमी अवस्थेत तळेकर यांना ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड**- तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा**- तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# आनंदनगरीत दरवळला मायेचा स्वाद आणि व्यवहार ज्ञानाचा सुगंध

**मानवत,/प्रतिनिधी:** ''कर्तृत्ववान मातांचा उत्साही मेळा,आनंदाने साजरा करूया ज्ञान- व्यवहाराचा सोहळा'' या उक्तीला सार्थ ठरवत, सौ. रामकंवर द्वारकादास लड्डा पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात आनंदनगरी हा अभिनव उपक्रम मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आला होते.

केवळ चविष्ट पदार्थांची मेजवानीच नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या व्यवहार ज्ञानाला उजाळा देणारा हा सोहळा मानवत करांचा आकर्षणाचे केंद्र ठरला. यावेळी आनंद नगरी कार्यक्रमाचे उद्घाटन विद्यालयाच्या पालक ज्येष्ठ महिलांच्या हस्ते करण्यात आले. मातृशक्तीचा सन्मान करत सुरू झालेल्या या सोहळ्याने परिसरात चैतन्याचे वातावरण निर्माण केले होते. महाराष्ट्रीयन खाद्य संस्कृतीचे दर्शन या उपक्रमात माता- पालकांनी आपल्या सुगरण पणाची चुणूक दाखवत महाराष्ट्राच्या मातीतील विविध खमंग आणि रुचकर पदार्थ तयार केले होते. घरगुती चवीच्या या पदार्थांनी उपस्थितांची मने जिंकली. केवळ लड्डा विद्यालयाचे विद्यार्थीच नव्हे, तर पाथरी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या विविध घटक संस्थांमधील विद्यार्थ्यां यांनी ही या मेजवानीचा आस्वाद घेतला. यामध्ये श्रीमती शकुंतलाबाई कांचनराव कत्रुवार विद्यालयाचे विद्यार्थी



के.के.एम.महाविद्यालयाचे विद्यार्थी, फार्मसी कॉलेजचे विद्यार्थी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पदार्थांवर ताव मारला. व्यवहार ज्ञानाची पाठशाळा केवळ खाणे- पिणे हा उद्देश न ठेवता, विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष बाजारात व्यवहार कसा करावा, हिशोब कसा ठेवावा आणि संवाद कौशल्य कसे आत्मसात करावे, या दृष्टीने या आनंद नगरी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेच्या या कल्पक उपक्रमाचे सर्वच स्तरांतून कौतुक होत आहे. शाळेने माता- पालकांना व्यासपीठ मिळवून दिले आणि विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञाना पलीकडचे व्यवहार ज्ञान दिले, ही बाब खरोखरच कौतुका स्पद आहे. या कार्यक्रम यशस्वि करण्यासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक,पर्यवेक्षक, शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी आणि माता- पालकांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्र रंगी रंगले मी

स्मरण

**चित्रा जोशी**

बंगलोर निवासी असलेलं राजम्मा नावाचं १०६ वर्षांचं हे पक्व फळ उर्वारुकमिव बंधनात मृत्योमुक्षियमामृतात हे वचन सार्थ करतं झालं. १३ जानेवारीला स्वतःच्या विशाखा या जन्म नक्षत्रावर आणि जन्म तिथीलाच ही कृतार्थ काया अलगद या जगतातून स्थूल शरीर रूपाने काळाच्या पडद्याआड गेली पण स्मृतिरूपानं अनेकांच्या मनात घर करून आहेत. चिरस्मरणात विराजमान आहेत.

१९१९ पौष एकादशीला म्हैसूर येथे लक्ष्मणराव आणि सावित्रीबाई या दाम्पत्याच्या पोटी त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील अंमलदार होते. अग्रहार प्राप्त असलेला हा परिवार. राजघराण्यात या परिवाराला सन्मानपूर्वक आमंत्रित केलं जायचं. राजम्मांनाही अनेक पूजांच्या वेळी कन्यापूजनाला आवर्जून बोलावलं जायचं, नटवलं जायचं. त्यामुळे बालपणापासून पूजेची, व्रतवैकल्यांची आवड निर्माण झाली. त्या काळात आठवी ही बोर्डाची परीक्षा होती, त्यात त्या जिल्ह्यातून पहिल्या आल्या. गणित हा त्यांचा प्रिय विषय होता. त्यामुळे हिशेबही त्या तोंडी पटापट करीत. बालवयातच लग्न होऊन त्या सासरी आल्या. तिथेही सर्वांना प्रिय झाल्या. शांताक्कांचे वडील श्री व्यंकटरामय्या हे परम गांधी भक्त. लग्नाचे वेळीच त्यांनी सांगितलं की लग्न करायचं तर खादीच वापरायची. खरं तर दक्षिणेत सिल्क प्रचूर प्रमाणात वापरलं जातं अन् संपन्न परिवारातील त्या वेळपर्यंत रोजच रेशमी वस्त्र घालणाऱ्या राजम्मांनी पती विचारांशी समरस होत, प्रथम अनेक वर्ष खादी व त्यानंतर आजीवन सुतीच कपडे घातले. एकदा गांधीजींच्या आवाहनाला प्रतिसाद देत त्यांनी आपलं स्त्रीधन समर्पित केलं आणि अनुकूल परिस्थिती असतानाही कधी पुन्हा सोनं घातलं नाही. असं निरासक्त होणं कठीण असतं. घरातील कुल परंपरा सांभाळत, व्रतवैकल्य करीत जीवन पुढे सरकत होतं. या घराचं वैशिष्ट्य असं की ते परमेशा इतकच राष्ट्र रंगातही रंगलं होतं. गंगा यमुना जशा एकमेकांत मिसळून एक वेगळा प्रवाह तयार होतो व तो अधिष्ठान लाभलेला प्रवाह जनतेचे जीवन सुजल सुफल करत जातो तसंच इथे झालं. राष्ट्र सर्वो परी ही भावना मनात खोलवर रुजली. एकदा माननीय भय्याजी जोशी यांच्या घरी गेले असताना आई काही वाचत होत्या. त्यावेळी त्यांनी वयाची नव्वदीही ओलांडली होती. अशा वयात वाचता येणंच अवघड आणि या तर चष्म्याशिवाय वाचू शकत होत्या. भय्याजींना वाटलं की, त्या पोथी वाचत आहेत, पण त्या क्रांतिकारक भगतसिंगांचं चरित्र वाचत होत्या. क्षणकाल भय्याजींनाही आश्चर्य वाटलं. परंतु त्या ज्या काळात वावरल्या त्यावेळी गांधीभक्त पतीच वागणं, घरातलं वातावरण, होणाऱ्या चर्चा, क्रांतिकारकांचे जीवन, त्यांना होणाऱ्या शिक्षा, वेळोवेळी होणारी आंदोलनं हे सारं सजगतेनं अनुभवणं त्यामुळे त्यांचं मनही राष्ट्र रंगी रंगलं ते कायमचं. 'देश हा देव असे माझा' हा भाव दृढ होत गेला आणि त्यामुळे वाचनात असू दे वा गोष्टी सांगताना, त्या देशभक्त कथाच सांगत. भगिनी निवेदितांचं म्हणणं की, देश आणि देव यांत देश आहे हे विसरू नका, हे त्यांनी स्वीकारलं, अंगीभूत केलं. परिणामतः

**सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे ॥**
**परंतु तेथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे ॥**

घरात चळवळीचं सामर्थ्य आणि साम्राज्य नांदू लागलं. राजम्मांची तीन मुलं श्री नागराज (पूर्व दक्षिण क्षेत्र संघ चालक), मंजुनाथन (प्रांत शारीरिक शिक्षण प्रमुख) आणि शांताक्का प्रांत कार्यवाहिका नंतर प्रमुख संचालिका असे या देशाला गौरवमय पद प्राप्त करून देण्याचं व्रत घेतलेल्या तिघांच्या रूपाने घरात देशभक्तीच्या लहरी लहरू लागल्यात.

**राष्ट्र हीच प्राथमिकता :** मंजुनाथन यांची मुलगी कर्नल तेजस्मिता आणि नातं जावई कर्नल तरुण यांच्या रूपान देशभक्तीची एक वेगळी धारा घरात प्रवेश करती झाली. तिसरी पिढीही त्याच रंगात रंगली. हे एक समाधान आणि आनंद होतं. तेजस्मिता सांगते, ''आम्ही जेवायला बसलो की आजी आम्हाला रोज गोष्टी सांगायची; कधी महाभारत, कधी सावरकर तर कधी मदनलाल. त्यामुळेच की काय उसळत्या रक्तात मा ज्वालामुखाचा दाह दे अशी तेजूची स्थिती झाली.'' तेजस्मिता प्रवीण वर्ग राष्ट्रसेविका समितीची तृतीय वर्ष प्रशिक्षित आहे. ती नृत्यही उत्तम करायची. तिचं अरंगेत्रमही झालं, पण सैन्यात जायचं हे स्वप्न होतंच. ते पूर्ण झालं ही घरातल्या सगळ्यांकरिताच आनंदाची बाब होती. तेजूचं प्रशिक्षण पूर्ण झालं, खरं तर ती नृत्य विशारद. त्यामुळे नृत्य कार्यक्रमाचे वेळी लांब केस त्याला गोंडा ही अनिवार्यच. पण अशीही तेजू एकावेळी घरी आली तर बॉयकट केलेला. तिला पाहिल्यावर आजीला काय वाटलं असेल... त्या शंभरीच्या जवळ आलेल्या आजींच्या दृष्टीने केस कापणं हे अक्षम्यचं.. पण शांतपणे त्या म्हणाल्या, ''तिनं जे व्रत, जो पेशा अंगीकारला आहे त्याच्या दृष्टीने जे काही करणं आवश्यक असेल ते तिला करायलाच हवं. तिथली जी शिस्त असेल तसंच वागावं लागेल. तिथे भावनांना महत्त्व देऊन कसं चालेल?'' तिनं फॅशन म्हणून ते केलं नाही हे समजून घेणे हे नव्वदी उलटल्यानंतर विशेष नाही का? आमच्या वेळचं असं काही न उगाळता हे देशाच्या हिताकरिता आहे हे त्यांनी समजून घेतलं ते वैचारिक अधिष्ठानाच्या आधारावर आणि त्यामुळेच की काय १९७५ ते १९७७ च्या आणिबाणी काळातही त्या पोलिसांच्या ससेमिऱ्याला समर्थपणे तोंड देऊ शकल्या. दोन्ही मुलं नागराज आणि मंजुनाथन संघ स्वयंसेवक. त्यामुळे अधिकाऱ्यांचं घरी नित्य जाणं-येणं असे. अनेकांच्या त्या आईच बनल्या, हक्काने 'मन की बात' सांगायचं ते एक स्थान होतं. क्वचित ती खाण्यापिण्याची आवड असेल तर कधी पारिवारिकही असायचं. आणिबाणीत तर भूमिगत असलेले अनेक जण निवासाला, बैठकी घ्यायला येत. घरी माननीय शेषाद्रीजी, यादवराव जोशी सुरक्षित स्थान म्हणून इथेच बैठकी घेत. त्यावेळी व्यंकटरामय्याजी अर्धांगवायूमुळे निजून असत. मुलगी शांताकुमारी जयदेवजींची बहीण म्हणून कारागृहात दर पंधरा दिवसांनी भेटायला जात. आतले निरोप बाहेर व बाहेरचे आत पोहोचवणे हे महत्त्वाचं काम असे. अशा काळात जवळजवळ १८ वेळा तरी घरी पोलिस चौकशीला आले. एकदा आले की तास दोन तास चौकशी चालायची. एकदा राजम्मांनी त्यांना



सांगितलं, ''अहो, तुम्ही कितीही प्रकारांनी विचारलं तरी मी कोणीही आलं नाही हेच सांगणार. असं बघा माझे यजमान आजारी आहेत. मला त्यांना काय हवं, नको ते सतत बघायला लागतं, मी त्यांच्याकडे लक्ष द्यायचं की इथे पुन्हा पुन्हा तेच सांगत राहायचं.'' एकदा तर एक महत्त्वाची व्यक्ती घरात आली होती. थोड्याच वेळात पोलिसही हजर. राजम्मांनी त्यांना वारंवार सांगितलं की, कोणी नाही घरात. पण ते पुन्हा पुन्हा विचारत राहिले. शेवटी राजम्मांनी त्यांना सांगितलं, मी माझ्या मुलांची शपथ घेऊन सांगते की आमच्या घरात कोणी नाही. हे अधिकारी जरा वेगळ्याच स्वभावाचे होते, त्यांनी वर्तमानपत्राचं एक कात्रण काढलं, ते राजम्मांना दाखवलं. अपघातात क्षतविक्षत झालेल्या माणसाचं छायाचित्र होतं. ते म्हणाले, ''तुम्ही खोटी शपथ घेतली असेल तर तुमच्या मुलांची अशी स्थिती होईल.'' राजम्मांचा चेहरा निर्विकार होता. कोणत्याही भीतीचं चिन्ह त्यांच्या चेहऱ्यावर उमटलं नाही, तेव्हा या बोलतात ते खरं असावं हे समजून ते निघून गेले. मी खोटं बोलले असले तरी ते देशाकरिता, सज्जनशक्ती रक्षणार्थ बोलले आहे, आजच्या घटकेला हे देवकार्यच आहे, माझ्या मुलांवर काहीही परिणाम होणार नाही हा ठाम विश्वास त्यांच्या मनात होता. 'लाख मरो लाखांचा पोशिंदा जगो' या उक्तीप्रमाणे भूमिगतला वाचवणं याला त्यांनी दिलेली प्राथमिकता हे त्यांच्या सुदृढ मानसिकतेचे प्रतीक आहे. तसंच पोलिस निघून गेल्यावर, त्या पोलिसांनी विचारलेले प्रश्न व त्याला त्यांनी दिलेली उत्तर लिहून काढून संबंधितांना देत. त्यामुळे संघ अधिकाऱ्यांनाही पोलिस खातं काय विचार करतंय, त्यांचे आराखडे काय आहेत याचा अचूक अंदाज येऊन कार्यदिशा ठरवायला मोलाची मदत होत असे. त्या काळात पोलिसांनी काही बंदींचा विलक्षण छळ केला. या सर्व गोष्टींची कल्पना असूनही त्यांनी दाखवलेलं धैर्य हे निश्चितच आश्चर्यकारक आहे. अधिष्ठान पक्कं असलं की व्यक्ती कशी खंबीर बनते याचं हे जिवंत उदाहरण आहे. रामजन्मभूमी आंदोलनाच्या वेळी तिघांनीही कारसेवेला जायचं ठरवल्यावर, ''एक जण थांबा'' असं त्या म्हणाल्या नाहीत.

**सर्वांनी मतदानाचा हक्क बजवावा :** यापूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी २०२३ ला त्या मतदानाला बुथवर जाऊन आल्या. मी मतदान केंद्रावर जाऊ शकते, घरी करणार नाही असं म्हणत त्या केंद्रावर गेल्या. १०३ वर्षांच्या, शंभरी पार केलेली व्यक्ती बुथवर येणं हे उत्साहाची लहर निर्माण करणारं ठरलं. जीवेत शरदः शतम हा आशीर्वाद सार्थ करणाऱ्या, चालत येणाऱ्या आजी सर्वांकरिताच एक अप्रूप होतं. कोणीतरी गमतीनं विचारलं, ''आजी, कशावर ठप्पा मारला?'' ''मतदान गुप्त असतं'', आजी उत्तरल्या. त्यांचं वय, त्यांचं ठामपणे बोलणं यामुळे वार्ताहर, फोटोग्राफर, बाईट घेणारे सारेच पुढे सरसावले. ''आजी तुमचा काय संदेश आहे?'' एकान विचारलं. ''सर्वांनी आणि तरुणांनी घराबाहेर पडून मतदान करावं, आपला हक्क बजवावा, आपले नागरिक कर्तव्य पूर्ण करावे.'' उस्फूर्तपणे अविलंब आलेलं त्यांचं उत्तर सर्वांनाच आश्चर्यचकित करून गेलं. कुणी त्यांच्या कानात सांगितलं किंवा प्रॉम्प्टिंग केलं असं नाही. त्यांची प्रज्ञा त्या क्षणीही जागृत होती.

**कर्मयोग हीच शक्ती :** त्यांचं घर बंगलोरला गार्डन परिसरात आहे. आजच्या भाषेत 'हार्ट ऑफ द सिटी' असं आहे. तिथून निमहान्स हे मनोरुग्णांकरिता असलेलं तसेच एक कॅन्सर हॉस्पिटल जवळच आहे. त्यामुळे नेहमीच कुणा ना कुणाकरिता डबे या घरातून जात. कधी रुग्णाचे नातेवाईक निवासाला असत. कधीकधी महिना अन् महिना राहत, पण त्या सर्वांचं आनंदानं करत. हे सातत्याने चालू असे पण विशाल परिवाराच्या आईला ते अवघड गेलं नाही. त्या अतिशय सुगरण होत्या. पोपटीचे दाणे घालून डोसे अतिशय उत्तम बनवत. कुणी कितीही सकाळी बाहेर पडलं तरी त्यांनी खाऊनच निघलं पाहिजे हा घराचा दंडक होता. त्यामुळे आलेली व्यक्ती तृप्त होऊनच बाहेर पडायची, पण त्याकरिता त्या माउलीने केलेला कर्मयोग विलक्षण आहे. कर्मयोगच त्यांची शक्ती होती व त्यातच त्यांची तृप्तीही होती. घरात केलेलं सांबार, भात, भाजी असं एकत्र कालवून त्यांनी दिलेल्या मातृहस्तेन घासाची भोजनाची आठवण त्यांच्या घरी येणाऱ्यांच्या मनात आजही ताजी आहे. त्याचा उल्लेख अन्त्यदर्शनाला आलेल्या अनेकांनी केला. त्या सकाळी शांत झाल्या. अल्पावधीतच त्यांच्या निधनाची बातमी कर्णोपकर्णी होऊन अनेक गणमान्य लोक अन्त्यदर्शनाला आले, मग ते येदुयरप्पांपासून तर निमहान्स इस्पितळाच्या डॉक्टरांपासून ते सामान्य कार्यकर्त्यांपर्यंत. सर्वांची एकच वेदना होती आई गेल्याची. निमहान्सचे डॉ. गंगाधर पूर्णवेळ तिथेच उपस्थित होते.

**प्रेमस्वरूप आई वात्सल्यसिंधू आई :** त्या खरोखरच अनेकांची आई होत्या. लहानपणीस मातृवियोग झालेल्या छोट्या वसंता स्वामीला हे घर आपलंच वाटायचं. राजम्मा तिच्या घरी तिची आई असताना हळदी कुंकवाला वगैरे जात असत. त्या तिला समजावीत, अगं तुझी आई देवीचं नेहमी सगळं खूप व्यवस्थित श्रद्धेने करायची, त्यामुळे तृतीयेला गौरीच्या दिवशी ती सवाष्ण गेली. पुढेही वसंता आक्काचे लग्न झाल्यावर आईसारखंच तू सगळं नीटनेटकं कर असं आग्रहानं तिला सांगितलं. वसंत आक्कांची आता सत्तरी झाली आहे, तिला आता नातं, नातू झाले असले तरी, मला तू तेवढीच लहान वाटते असं म्हणून जवळ घेत. तिच्या डोक्यावरून हात फिरवीत.

**तिला शिकू द्या :** समितीच्या बंगलोरच्या एक अधिकारी बाल विधवा झाल्या. माहेरीमाघारी आल्या. संपन्न घर होतं. आर्थिक चिंता त्या मुलीला कधी करावी लागणार होती असं नाही. त्यामुळे तिला पुढे शिकवावं असं फारसं घरच्यांच्या मनात आले नाही. एकुलत्या एका मुलीवर आकस्मिक अकाली आलेलं हे संकट, सर्वच दिगमूढ झालेले. अशावेळी व्यंकटरामय्याजी आणि राजम्मा त्यांच्या घरी गेले आणि तिला घरात बसवू नका, तिला शिकू द्या. तिला त्याची आवड आहे असे सांगितले आणि तिचं शाळेत जाणं सुरू झालं. एका कॉलेजच्या प्राचार्य म्हणून त्या निवृत्त झाल्या. त्यांच्या मार्गदर्शनाने अनेक मुलींचे जीवन उजळले पण त्या बालकलिकेचं जीवन उजळलं ते व्यंकटरमय्या आणि राजम्मा यांच्यामुळे. कदाचित स्वतःचं अपूर्ण राहिलेलं शिक्षण त्या वेदनेनेही राजम्मांना एवढं आग्रही बनवलं असेल.

घरातही राजम्मा आणि मंजुनाथन यांच्या पत्नी सुमा वहिनी यांचे संबंध सुमधुर होते. सुमा वहिनी आजारी झाल्या. आईला सहन होणार नाही म्हणून कुणी त्यांना तिच्या आजाराची कल्पना दिली नाही. सुनेला वाटायचे त्यांना दुःख नको आणि आईला वाटायचं, ही खात पीत नाही, आपली तिला मदत नाही. नात सुनेवर अंबिकेवर भार येतो आणि त्यामुळे सोवळंही थोडं शिथिल झालं. दोघीही एकदुसरीची चिंता करत.

२०१९ मध्ये नातीन तेजस्मितानं विवाह निश्चित केला. तेजस्मिता आता एम. तेजस्मिता तरुण झाली. तेही आर्मीतच आहे. तो गुणी आहे हे प्रथम भेटीतच त्यांना त्याच्या व्यवहारातून जाणवलं आणि जावई सुंदर तसा गुणी आहे याचं समाधान त्यांनी व्यक्त केलं. तो याच विचारांचा, याच शिस्तीतला. दोघेही एकाच विचारांचे त्यामुळे तिला तिचं काम निर्वेधपणाने करता येईल. करीअर विथ कॅरेक्टर ती करू शकेल असा विश्वास त्यांना आला. तो त्यांनी व्यक्त करून दाखवला. सत्येनचा मुलगा चार वर्षांचा अगस्त्य यालाही सारखी येता जाता पणजीच हवी असायची. रोज तिच्याशी खेळायचं, गोष्ट ऐकायची, तिला चालवायचं, तिच्या मांडीवर बसून दूध प्यायचं, तासन्तास ते दोघे एकमेकांशी खेळत.

१२ जानेवारीला एक कार्यक्रम ठरला होता. अनेकांनी १०६ वर्षांची व्यक्ती बघितलीच नव्हती आणि तीही स्वतःचं सर्व काही करू शकणारी. त्या दिवशी कोणी धावत तर कोणी चालत, कुणी सायकलवर असं त्यांच्या घरी यायचं, आईशी संवाद साधायचा आणि मग जायचं पण आईला दिनांक दहालाच दवाखान्यात न्यावं लागलं. सर्व जण आले होते. कॉफी अल्पाहार झाला पण आईला भेटता आलं नाही. इन्फेक्शनचं छोटसं निमित्त झालं. ११ ला शांताक्का पोहोचल्या. बाराला तेजू, तरुण. सर्वांना त्यांनी ओळखलं. सर्व चौकशी केली. त्यांच्या अंतिम रात्री दिनांक बाराला तेजस्मिता-तरुणच त्यांच्या जवळ होते. एकेक अवयव शिथिल होत होता. अंतिम क्षण जवळ आला असल्याचं लक्षात घेताच जवळच घरी असलेल्या सर्वांना त्यांनी बोलावून घेतलं. गंगा मुखी घेत, रामनाम ऐकत त्यांनी एकादशीच्या दिवशी वैकुंठ गमन केलं. दर्शनाला येणारा प्रत्येक जण फुलं, तुळशी, चंदनमाला घेऊन येत होता. त्यांच्या भावना त्यातून व्यक्त होत होत्या. फुलं सांगत होती, प्रेमाचा, वात्सल्याचा, राष्ट्रभक्तीचा सुगंध, तर चंदनमाला त्यांच्या त्यागाच्या गाथेचं प्रतीक होतं अन् तुळशीमाला समर्पण, पवित्रतेचं प्रतीक. मातीचा सुगंध मातीत मिसळला, तिच्याशी एकरूप झाला. आता उरल्या आहेत त्या केवळ आठवणी.

(अ. भा. सह कार्यवाहिका, राष्ट्र सेविका समिती)

रविवारची पत्रे

## समर्थ रामदासांचे जीवनकार्य, पंचपरिवर्तनाचा मूळ गाभा

सतराव्या शतकातील महाराष्ट्र हा राजकीय अस्थिरता, सामाजिक नैराश्य आणि परकीय आक्रमणांच्या छायेखाली वावरत होता. अशा अत्यंत प्रतिकूल कालखंडात समर्थ रामदास स्वामींनी आपल्या प्रखर विचारसरणीतून आणि कृतीतून समाजाला एका नव्या चैतन्याची दिशा दिली. समर्थांचे जीवनकार्य केवळ अध्यात्मापुरते मर्यादित नव्हते, तर ते राष्ट्रनिर्मितीच्या व्यापक प्रक्रियेशी जोडलेले होते. त्यांच्या वाङ्मयातील 'दासबोध', 'मनाचे श्लोक' आणि इतर स्फुट रचनांमधून या मूल्यांचा उगम आणि विस्तार झालेला दिसून येतो.

समर्थ रामदास स्वामींचा जन्म जालना जिल्ह्यातील जांब या गावी १६०८ मध्ये रामनवमीच्या दिवशी झाला. त्यांचे मूळ नाव नारायण सूर्याजी ठोसर होते. लहानपणापासूनच नारायण अत्यंत चिंतनशील आणि उपजत बुद्धिमत्ता असलेले बालक होते. त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारी पहिली महत्त्वाची घटना म्हणजे वयाच्या बाराव्या वर्षी विवाहाच्या प्रसंगी 'सावधान' हा शब्द ऐकताच त्यांनी मांडवाबाहेर काढलेली धाव होय. प्रपंचात अडकण्याऐवजी समाजाच्या कल्याणासाठी स्वतःला झोकून देण्याची ही त्यांची पहिली जाणीवपूर्वक कृती होती.

त्यानंतरची बारा वर्षे त्यांनी नाशिकजवळील टाकळी येथे अत्यंत कडक तपश्चर्या, साधना आणि व्यायामात व्यतीत केली. वयाच्या २४ व्या वर्षी त्यांना आत्मसाक्षात्कार झाला आणि त्यांनी 'रामदास' हे नाव धारण केले. त्यांच्या जीवनाचा पुढचा टप्पा म्हणजे बारा वर्षांची भारतभ्रमण यात्रा, ज्यामध्ये त्यांनी संपूर्ण भारतवर्षाची सामाजिक, राजकीय आणि धार्मिक स्थिती प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिली. या प्रवासात त्यांना परकीय सत्तेखाली दडपल्या गेलेल्या समाजाचे विदारक दर्शन झाले, ज्यातून 'महाराष्ट्र धर्माची' आणि पर्यायाने राष्ट्रोद्धाराची संकल्पना विकसित झाली.

त्याकाळी समाजात पसरलेल्या दैववादाला समर्थांनी प्रखर विरोध केला आणि त्याऐवजी 'प्रयत्नवादाची' स्थापना केली. समर्थांनी 'यत्नदेव' ही संकल्पना मांडली, ज्यानुसार प्रयत्न हाच परमेश्वर आहे. नशिबाच्या रेषा माणसाने स्वतःच्या कष्टाने पुसून काढल्या पाहिजेत, असे ते सांगत. दासबोधामध्ये त्यांनी आळसाचे अत्यंत विदारक वर्णन केले असून, आळस हा माणसाचा सर्वांत मोठा शत्रू असल्याचे प्रतिपादिले आहे. स्व-आधारित जीवनासाठी माणसाने प्रथम स्वतःच्या अवगुणांचे निरीक्षण केले पाहिजे आणि ते दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला पाहिजे. जोपर्यंत व्यक्ती स्वतःच्या दोषांवर विजय मिळवत नाही, तोपर्यंत ती समाज परिवर्तनासाठी पात्र ठरत नाही. 'मनाचे श्लोक' या माध्यमातून त्यांनी मानवी मनावर संस्कार करण्याचे काम केले. मनातील काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर या षड्रिपूंना जिंकल्याशिवाय स्व-आधारित आणि संतुलित जीवन जगता येत नाही, हा संदेश त्यांनी २०५ श्लोकांमधून दिला. महाराष्ट्रातील भौगोलिक स्थिती लक्षात घेता समर्थांनी पाण्याचे महत्त्व विशद केले. पावसाचे पाणी जमिनीत जिरवण्यासाठी शोष खड्डे बनवणे, पाण्याचा अपव्यय टाळणे आणि नद्यांचे प्रदूषण रोखणे या गोष्टींना त्यांनी प्राधान्य दिले. झाडे लावणे आणि ती जगवणे यातील फरक त्यांनी स्पष्ट केला; केवळ वृक्षारोपण करून चालणार नाही, तर त्यांचे संगोपन करणेही गरजेचे आहे. समर्थांनी संन्यासवादापेक्षा गृहस्थाश्रमाला अधिक महत्त्व दिले. आधी प्रपंच करावा नेटका, मग घ्यावे परमार्थ विवेका या उक्तीतून त्यांनी प्रपंच आणि परमार्थाचा सुंदर समन्वय साधला. समर्थांनी शिवाजी महाराजांच्या कार्याला जोडून घेताना विविध समाजघटकांना एकत्रित केले. मावळा, शेतकरी, कारागीर या सर्वांना त्यांनी स्वराज्य आणि स्वधर्माच्या प्रेरणेने एकत्र आणले. दासबोध हा समर्थांचा सर्वांत महत्त्वाचा ग्रंथ असून तो संवादात्मक शैलीत लिहिलेला आहे. या ग्रंथात अध्यात्मासोबतच राजकारण, समाजकारण, व्यवस्थापन आणि नागरी कर्तव्यांचे सखोल विवेचन आहे. समर्थ रामदास स्वामींनी त्यांच्या जीवनातून आणि साहित्यातून जे विचार मांडलेत ते आज आपण अनुभवीत असलेल्या पंचपरिवर्तन संकल्पनेचा मूळ गाभा वाटतो. ते कोणत्याही एका काळापुरते मर्यादित नाही. त्यांचे 'स्व-आधारित जीवन' आजच्या स्पर्धेच्या युगात स्वावलंबनाचा मंत्र देते. त्यांचे 'पर्यावरण' विचार जागतिक तापमान वाढीच्या संकटात दिशा दाखवतात. 'कल्याणकारी कुटुंब संस्कृती' आधुनिक विखुरलेल्या कुटुंबांना जोडण्याचे काम करू शकते. 'नागरी कर्तव्य' हे सशक्त लोकशाहीचा पाया आहे आणि 'सामाजिक समरसता' ही देशाच्या अखंडतेसाठी अनिवार्य आहे.

**श्रीकांत भास्कर तिजारे**/९४२३३८३९६६

## वरिष्ठ नागरिक परिसंघ : ज्येष्ठांना दिलासा देणारी संघटना

भारतीय मजदूर संघद्वारा संचालित वरिष्ठ नागरिक परिसंघाचा ७ फेब्रुवारीला वर्धापन दिवस असतो. त्यानिमित्त देशभर विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. त्यात प्रामुख्याने स्वास्थ्य चिकित्सा शिबिर, संगोष्ठी, प्रशिक्षण वर्ग आदी कार्यक्रमांचा समावेश असतो. मूळ उद्देश समाजातील ज्येष्ठ नागरिकांना संघटित करणे, त्यांच्या समस्या समजून घेत त्यावर उपाययोजना करणे हे आहे.

ज्येष्ठ नागरिकांच्या मूळ समस्यांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येईल. पारिवारिक, सामाजिक, आर्थिक, आरोग्य आणि सर्वांत मोठी आणि नित्य नियमाने भेडसावणारी समस्या आहे एकटेपणा. एका सर्वेक्षणानुसार वरील समस्याग्रस्त ज्येष्ठ नागरिकांची संख्या जवळपास ६८ टक्के आहे. डिसेंबर २०२५ अखेर भारतात ज्येष्ठ नागरिकांची संख्या १४.९० कोटी होती. त्यात ६८ टक्के मानसिक रुग्ण असतील तर ती चिंतेची बाब आहे. सीनिअर सिटिझन्स प्रोटेक्शन ॲक्ट २००७ अंतर्गत देशातील न्यायालयात ७ कोटी प्रकरणे प्रलंबित असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. यावरून या विषयाची तीव्रता लक्षात येऊ शकते. केंद्र सरकारने ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध योजना कार्यान्वित केल्या आहेत. त्या अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांना सामाजिक सुरक्षा प्रदान केली जात आहे. पण त्यात अडथळे अधिक आहेत. त्यावर उचित मार्गदर्शन आणि उपाययोजना करण्याचे काम वरिष्ठ नागरिक परिसंघ करीत आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार पेन्शनचे पुनर्निर्धारण करण्याचे काम गेल्या तीन वर्षांपासून सुरू आहे पण ते कासवाच्या गतीने. त्यामुळे लाखो निवृत्तिधारकांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. भविष्य निधी कार्यालयाकडून अपेक्षित सहकार्य मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी येत आहेत. आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत ५ लाखापर्यंत गंभीर स्वरूपाच्या आजारात मोफत उपचार करण्याची तरतूद आहे. त्याकरिता नॅशनल हेल्थ अथॉरिटीने परिचय कार्ड दिले आहे. पण संकटकाळी या कार्डचा उपयोग होत नाही. उलट आधी पैसे भरा मग ट्रीटमेंट ही स्थिती अनुभवाला येत आहे. भारतात ज्येष्ठ नागरिकांची संख्या तीव्र गतीने वाढत आहे. त्या बरोबर समस्या देखील वाढत आहेत. परिवार आणि समाजात योग्य मानसन्मान, समान वागणूक मिळत नाही अशा तक्रारी बऱ्याच आहेत. त्यात प्रामुख्याने ते ज्येष्ठ नागरिक आहेत ज्यांची आर्थिक स्थिती नाजूक आहे. दुसऱ्यावर पूर्णपणे विसंबून आहेत. लाखो ज्येष्ठ नागरिक असे आहेत ज्यांना पेन्शन मिळत नाही. दुसरा आर्थिक स्रोत नाही. डॉ. मोहिनी गिरी आयोगाने केंद्र सरकारला फेब्रुवारी २०११ ला सादर केलेल्या अहवालात सर्वांना पेन्शन देण्यात यावी अशी शिफारस केली आहे, पण त्यावर केंद्र सरकारने अजूनपर्यंत कार्यवाही केली नाही. ते अहवाल थंड्याबस्त्यात पडला आहे. त्यामुळे बहुतांश ज्येष्ठ नागरिकांची स्थिती न घरका ना घाटका अशी झाली आहे.

वरिष्ठ नागरिक परिसंघ वरील सर्व समस्यांवर तोडगा काढण्याचा प्रयत्न गेल्या १० वर्षांपासून करीत आहे. त्याकरिता ज्येष्ठ नागरिकांनी एकत्र येण्याची गरज आहे. सामूहिक प्रयत्न झालेत तर अपेक्षित यश निश्चित मिळेल. ज्येष्ठ नागरिकांसाठी वरिष्ठ नागरिक परिसंघाचे व्यासपीठ खुले आहे. त्यांनी त्याचा उपयोग करावा. ज्येष्ठ नागरिकांच्या सुख-दुःखात वरिष्ठ नागरिक परिसंघ बरोबरीचा वाटेकरी आहे.

**वसंत पिंपळापुरे**/नागपूर

## श्री दुर्गा सप्तशती : एक अलौकिक ग्रंथ

श्री दुर्गा सप्तशती हा भारतीय आध्यात्मिक परंपरेतील एक अत्यंत महत्त्वाचा, अलौकिक आणि शीघ्र फलदायी ग्रंथ मानला जातो. देवी उपासनेमध्ये या ग्रंथाचे स्थान अनन्यसाधारण असून, श्रद्धा, तत्त्वज्ञान आणि साधना यांचा सुंदर संगम यात आढळतो. श्री मार्कंडेय ऋषींनी रचलेला हा ग्रंथ संस्कृत भाषेत असून अनुष्टुप छंदात रचित आहे. सातशे मंत्रांचा समावेश असल्यामुळे या ग्रंथास 'सप्तशती' असे नाव प्राप्त झाले आहे. लयबद्ध पठन केल्यास पठन करणारा तसेच ऐकणारा यांना एक विशेष प्रकारचा आध्यात्मिक आनंद अनुभवास येतो.

या ग्रंथाची कथा राजा सुरथ, समाधी नावाचा वैश्य आणि मेधा ऋषी यांच्या संवादातून उलगडत जाते. युद्धात पराभूत झाल्याने राज्य गमावलेला राजा सुरथ आणि पत्नी व मुलांनी धनाच्या लोभामुळे घरातून हाकलून दिलेला वैश्य समाधी हे दोघेही मेधा ऋषींच्या आश्रमात आश्रयास येतात. आश्रमात राहत असतानाही त्यांच्या मनात सतत संसाराचे, कुटुंबाचे विचार येत राहतात. मोहावर नियंत्रण मिळत नसल्याने ते या स्थितीचे कारण मेधा ऋषींना विचारतात. तेव्हा मेधा ऋषी स्पष्ट करतात की हा सर्व प्रभाव महामायेचा आहे. संसाराची निर्मिती, त्याचे संचालन आणि त्यातील आसक्ती हे सर्व महामायेच्या प्रभावामुळेच घडते. ज्ञानी व्यक्तींनाही तिच्या प्रभावातून पूर्णपणे सुटका होत नाही, असे ऋषी सांगतात.

**तथापि ममतावर्ते मोहगर्ते निपातिताः।**
**महामायाप्रभावेण संसारास्थितिकारिणा ॥**
**ज्ञानिनामापि चेतांसि देवी भगवती हि सा।**
**बलादाकृष्य मोहाय महामाया प्रयच्छति ॥**

(अध्याय १ - श्लोक ५३,५५)

यानंतर महामायेचे स्वरूप, तिची उत्पत्ती आणि कार्य याविषयी सविस्तर विवेचन येते. देवी नित्यस्वरूप असली तरी देवांनी संकटसमयी केलेल्या प्रार्थनेमुळे ती विविध रूपांत प्रकट होते. दुर्गा सप्तशतीमध्ये एकूण तेरा अध्याय असून त्यात श्री महाकाली, श्री महालक्ष्मी आणि श्री महासरस्वती यांच्या अवतारकथा वर्णिल्या आहेत.

महिषासुराचा वध करणारी अष्टादशभुजा श्री महालक्ष्मी, ब्रह्मदेवांच्या प्रार्थनेतून प्रकट झालेली दशभुजा श्री महाकाली आणि शुंभ-निशुंभादी दैत्यांच्या त्रासामुळे देवांनी केलेल्या प्रार्थनेतून प्रकट झालेली अष्टभुजा श्री महासरस्वती या तिन्ही शक्तींचे स्वरूप, पराक्रम आणि महत्त्व या ग्रंथात सविस्तरपणे मांडले आहे.

आपण ज्यांना श्रेष्ठ देव व देवि मानतो अशा श्री ब्रह्मा, श्री विष्णू व श्री महेश तसेच श्री सरस्वती, श्री. लक्ष्मी व श्री गौरी यांची उत्पत्ती श्री महालक्ष्मी, श्री महाकाली व श्री महासरस्वती यांनीच केली व त्यांचे विवाहही त्यांनीच लावून दिले अशा अर्थाचे विवेचन प्राधानिक रहस्यांत आलेले आहे.

सप्तशती पाठाचे तीन-चार प्रकार आहेत. पण एक सहा अंगांचा पाठ व एक संपुटीत पाठ हे जास्त प्रचलित आहेत. संपुटीत पाठ म्हणजे आपण जो मंत्र निवडू तो मध्यभागी आधी ऋचा व नंतर तीच ऋचा, याला ४/५ तास लागतात पण याचे फळही शीघ्र मिळते. नवचंडी, शतचंडी, सहस्रचंडी अशीही पाठांची अनुष्ठाने आहेत.

व्यक्तिगत जीवनातील चिंता, आर्थिक अडचणी, विवाह, न्यायालयीन प्रकरणे अशा अनेक समस्यांवर उपाय सुचवणारा हा ग्रंथ श्रद्धाळूंना मानसिक बळ आणि आत्मविवास प्रदान करतो. म्हणूनच दुर्गा सप्तशती हा केवळ धार्मिक ग्रंथ न राहता, श्रद्धा आणि जीवनदृष्टी देणारा दिव्य ग्रंथ ठरतो.


**जयवंत लक्ष्मण धबाब**/७०४५८३३५२०

# श्री संत गजानन महाराज समाजोपयोगी जीवनाचा वारसा

प्रासंगिक

**दीप्ती राखुंडे**

श्री संत गजानन महाराज अद्वितीय अवतारी पुरुष होते. ते फक्त हातचलाखी करून चमत्कार दाखविणारे संत नव्हते, तर त्यांच्या जीवनाचा प्रत्येक पैलू समाजासाठी, लोककल्याणासाठी आणि आध्यात्मिक मार्गदर्शनासाठी समर्पित होता. महाराजांनी आपल्या योगसिद्धीच्या माध्यमातून जे कार्य केले, ते माणसाच्या बुद्धीला समजेल असे नव्हते. त्यातील अनाकलनीय आणि अद्भुत कृती सामान्य लोकांना चमत्कार म्हणून दिसत होत्या. काही पोथ्यांच्या उल्लेखांनुसार, गजानन महाराज हे दिगंबर पंथीय योगपुरुष होते. श्री गजानन महाराज (शेगाव) आणि श्री स्वामी समर्थ (अक्कलकोट) हे दोघेही महाराष्ट्रातील परमहंस संन्यासी आणि दत्त अवतार मानले जातात. शेगावला प्रकट होण्यापूर्वी गजानन महाराजांनी स्वामी समर्थांच्या सान्निध्यात काही काळ व्यतीत केला होता. त्यांच्या शिकवणीचा वारसा पुढे नेण्याचा त्यांनी प्रण केला होता. ते साईबाबा, जंगली महाराज, बाबा ताजुद्दीन यांसारख्या समकालीन संतांसमवेत कार्यरत होते. या संतांचा उद्देश लोकांना योग्य मार्गावर नेणे आणि धर्म, श्रद्धा, नैतिकता आणि समाजोपयोगी मूल्यांची शिकवण देणे हा होता.



**न्याय, लोककल्याणासाठी कार्य :** महाराजांनी अनेक प्रसंगांमध्ये आपल्या योगसिद्धीच्या शक्तीने अशा अनाकलनीय कार्यांचे दर्शन घडविले की, लोक त्यांना चमत्कार मानत. एकदा उन्हाळ्यात महाराजांना तहान लागली. त्यांनी भास्कर पाटील या शेतकऱ्याकडे पाणी मागितले. त्याने देण्यास नकार दिला आणि विचारले की, जर तुम्ही खरंच अवतारी आहात, तर या कोरड्या विहिरीला पाणी आणून दाखवा. महाराजांनी गंगा, यमुना आणि सरस्वतीचे नाव घेतले आणि त्या कोरड्या विहिरीतून पाण्याचे झरे वाहू लागले. तसेच महाराजांनी सुकलेल्या आंब्याच्या झाडाला क्षणात हिरवेगार करून दाखविले. हे हातचलाखीने शक्य नाही. लोकमान्य टिळकांच्या कार्यक्रमात महाराजांनी प्रसंगानुरूप मार्गदर्शन केले. टिळकांना ब्रिटिश सरकारकडून न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी मार्गदर्शन केले. टिळकांच्या खटल्यात त्यांची मदत अप्रत्यक्ष पण निर्णायक ठरली. यामुळे सिद्ध होते की महाराजांचे कार्य फक्त लोकांना मंत्रमुग्ध करण्यापुरते मर्यादित नव्हते, तर ते समाजातील न्याय, धर्म आणि लोककल्याणासाठी होते.

**शेगाव आजही आदर्शाचे केंद्र :** महाराजांनी समाजोपयोगी कार्यात कोणताही स्वार्थ न ठेवता, फक्त लोककल्याणासाठी आपल्या योगसिद्धीचा उपयोग केला. त्यांनी जिवंतपणीच आपल्या समाधीची वेळ आणि स्थान निश्चित केले. समाधी घेतल्यानंतर त्यांचे शरीर आंतरिक योगऊर्जेने उष्ण राहिले, तर काही लोकांनी त्यावर संशय घेतला तरी महाराजांनी प्रकटपणे योगशक्तीचे अद्भुत दर्शन घडविले. त्यांनी पूर आलेल्या नदीतून होडीला हात लावून किनाऱ्यावर आणणे, जळत्या पलंगावर बसणे, मधमाश्यांचे काटे बाहेर काढणे, उसाची मोळी पिळणे आणि पुरोहितांना गीतेतील क्लिष्ट अध्याय अर्थासह सांगणे यांसारख्या अनेक अकल्पनीय कृती केल्या. महाराजांचे कार्य फक्त धार्मिक किंवा आध्यात्मिकच नव्हते; त्यांनी समाजातील लोकांना रोजगार, संस्कार आणि आध्यात्मिक मार्गदर्शन दिले. शेगाव संस्थान हे आजही त्यांच्या शिकवणीचा, योगसिद्धीचा समाजोपयोगी दृष्टिकोनाचे आदर्श केंद्र आहे. संस्थानात स्वच्छता, प्रामाणिकपणा, पारदर्शक प्रशासन, सामाजिक विकास आणि धार्मिक कार्य यांचे उत्तम उदाहरण दिसते.


**महाराजांच्या मूल्यांचा अवलंब करा :** गजानन महाराज हे आपल्या जीवनातून दाखवतात की श्रद्धा, धर्म आणि समाजोपयोगी कार्य एकत्रित असावे. त्यांनी फक्त लोकांना भक्ती करण्यास शिकविले नाही, तर जीवनात नैतिकता, सेवा, सहकार्य आणि ज्ञान यांचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांच्या शिकवणीमुळे आणि कार्यामुळे शेगाव संस्थान आज संपूर्ण भारतात आदर्श ठरले आहे, आणि हजारो लोकांना प्रेरणा देत आहे. गजानन महाराजांचा वारसा ही एक अमूल्य संपत्ती आहे. त्यांनी धर्म, योगसिद्धी, समाजोपयोगी कामे आणि नैतिक शिक्षण यांचा समन्वय साधून भारतीय समाजाला दिशा दाखवली. आजही त्यांच्या शिकवणुकीचा प्रभाव प्रत्येक कार्यक्षम, प्रामाणिक आणि समाजसेवी संस्थेत दिसतो. त्यांच्या जीवनाचे आणि कार्याचे स्मरण करून प्रत्येक जण जीवनात श्रद्धा, सेवा आणि न्याय या मूल्यांचा अवलंब करू शकतो हे नक्की.

**गण गण गणात बोते!**

९५०३९१०८२२

## स्त्रीशक्तीचा खरा अर्थ सांगणारी जानकी जयंती

माघ महिन्यातील वद्य पक्षातील नवमी तिथीला जानकी जयंती साजरी केली जाते. मुख्यतः उत्तर भारतात हा दिवस विशेष श्रद्धेने आणि भक्तिभावाने साजरा केला जातो. हा दिवस म्हणजे माता सीतेचा (जानकी मातेचा) जन्मोत्सव! या दिवशी अनेक स्त्रिया अखंड सौभाग्यासाठी, सुख-समृद्धीसाठी व्रत करतात. त्याग, शील, संयम आणि धैर्याचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजे सीता माता! प्रभू श्रीरामांशी विवाह झाल्यानंतर राजवैभवाचा त्याग करून स्वीकारलेला वनवास, रावणाने केलेले अपहरण, अग्निपरीक्षेसारख्या कठोर प्रसंगांतून गेलेले तिचे जीवन तिच्या असामान्य सहनशीलतेचे दर्शन घडवते. लंकेत असताना रावणाच्या सर्व प्रलोभनांना ठाम नकार देत तिने स्वतःचे शील जपले.



माता सीतेचे जीवन आजच्या काळातील स्त्रियांसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. परिस्थिती कितीही कठीण असली तरी कर्तव्याचा मार्ग न सोडता धर्मनिष्ठ राहण्याचा संदेश तिच्या आचरणातून मिळतो. आजच्या काळात स्त्रीशक्तीचा अर्थ म्हणजे केवळ तिला मिळालेले बाह्य स्वातंत्र्य एवढाच मर्यादित नाही, तर आत्मविश्वास, निर्णय घेण्याची क्षमता आणि स्त्रीचे चारित्र्यबळ हा खरा स्त्रीशक्तीचा अर्थ आहे. माता सीतेच्या जीवनातून संयम, त्याग, आत्मविश्वास आणि धर्मनिष्ठा हे गुण अंगीकारल्यास निश्चितच समाज अधिक सुसंस्कृत आणि सशक्त बनेल.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)





## गण गण गणात बोते...

बीड शहरातील सहयोगनगर भागातील श्री संत गजानन महाराज मंदिरात प्रकट दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. (छाया-श्रीकांत कुलकर्णी)


# आयुर्वेद आणि प्राचीन भारतीय चिकित्सा पद्धती मानवी आरोग्यासाठी महत्वाची-डॉ. देबश्री काकती

### प्रोफेसर विजय कोठेकर ज्ञानविज्ञान व्याख्यानमाला संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.८ फेब्रुवारी**

प्रोफेसर विजय कोठेकर ज्ञानविज्ञान व्याख्यानमाला ७ फेब्रुवारी रोजी संपन्न झाली.डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर संलग्नित, वनस्पतीशास्त्र विभाग, बाबुरावजी आडसकर महाविद्यालय, केज व श्रीमती केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर महाविद्यालय, बीड. शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब जिल्हा धाराशिव . कै शंकरराव गुट्टे ग्रामीण महाविद्यालय, धर्मापुरी तालुका परळी व वसंतदादा पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पाटोदा जिल्हा बीड यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ दरम्यान सहा दिवसीय आभाशी पद्धतीने घेण्यात आलेले व्याख्यानमालेचे सत्र संपन्न झाले. विज्ञान शाखेतील विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शक या सर्व घटकांना विज्ञानातील नवीन प्रवाह, नवनवीन संशोधन आणि संशोधनातील नवीन मार्ग याविषयीचं सखोल ज्ञान व्हावे या उद्देशाने वनस्पतीशास्त्र विभागातर्फे प्रोफेसर विजय कोठेकर ज्ञानविज्ञान व्याख्यानमाला २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानमालेचे उद्घाटन दिनांक २ फेब्रुवारी २०२६ रोजी डॉ. सरस श्रीवास्तव , दयानंद अँग्लो वैदिक महाविद्यालय, कानपूर उत्तर प्रदेश यांच्या उपस्थितीमध्ये व डॉ. इंद्राणी पॉल, जैवतंत्रज्ञान विभाग , ब्रेनवेल विद्यापीठ कोलकत्ता, पश्चिम बंगाल यांच्या अध्यक्षतेखाली आभासी पद्धतीने संपन्न झाले.

या ज्ञानविज्ञान व्याख्यानमालेच्या प्रथम सत्रामध्ये प्रमुख व्याख्याते डॉ. इंद्रायणी पाल मॅडम यांनी सूक्ष्मजीवांचे महत्त्व व मानवी दैनंदिन जीवनातील त्यांचा सहभाग, आर्थिक स्थैर्यासाठी परिणामकारक उपयुक्तता याविषयी आपले संशोधन विद्यार्थ्यांसमोर मांडले . या सत्रचे अध्यक्ष प्रोफेसर मुकुंद कुलथे सर विभागप्रमुख वनस्पतीशास्त्र विभाग, मिलिंद विज्ञान महाविद्यालय छत्रपती संभाजी नगर हे होते. व्याख्यानमालेच्या दुसऱ्या सत्राचे प्रमुख वक्ते डॉ. शरद कांबळे , वनस्पतीशास्त्र विभाग, के टी एच एम महाविद्यालय, नाशिक यांनी वनस्पतीचे वर्गीकरणशास्त्र याविषयी वनस्पतीच्या वर्गीकरणची गरज, सद्यपरिस्थितीमध्ये वनस्पतीचे महत्व व भविष्यकालीन संशोधनांमध्ये वनस्पती वर्गीकरणाचे फायदे व त्यातून निर्माण होणाऱ्या नोकरीच्या संधी याविषयी आपले संशोधन विद्यार्थ्यां समोर विशद केले. या सत्रचे अध्यक्ष डॉ. शिवराम खडके , वनस्पतीशास्त्र विभाग, श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सांगली हे होते. ज्ञानविज्ञान व्याख्यानमालेच्या तिसऱ्या सत्राचे प्रमुख वक्ते प्रोफेसर हितेश कुमार सोलंकी , वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख गुजरात विद्यापीठ अहमदाबाद, यांनी पर्यावरणामधील जैवविविधता आणि जैवविविधता टिकवण्यासाठीची आव्हाने व जबाबदारी याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले . या सत्रचे अध्यक्ष प्रोफेसर दत्ता ढाले , वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी आर घोगरे विज्ञान महाविद्यालय, धुळे हे होते. ज्ञान विज्ञान व्याख्यानमालेमध्ये चौथ्या सत्रात प्रमुख व्याख्याते डॉ. किरण जाधव, प्रमुख संशोधक, एकात्मिक शेती विभाग वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी यांनी एकात्मिक पद्धतीने केलेल्या शेतीचे स्वरूप त्याचे फायदे , शेती उत्पादनामधील वाढलेला खर्च कमी करण्याची पद्धत व कमी जागेमध्ये एकात्मिक पद्धतीने जास्तीत जास्त घ्यावयाची पिके यासंदर्भात सखोल असे मार्गदर्शन केले. या सत्रचे अध्यक्ष प्रोफेसर लक्ष्मीकांत शिंदे प्राणिशास्त्र विभाग, जेईएस महाविद्यालय जालना हे होते. या व्याख्यानमालेमध्ये पाचव्या सत्राचे व्याख्यात्या डॉ. देबश्री काकती वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख, मंगलदाय महाविद्यालय, दरंग, आसाम यांनी आयुर्वेद आणि प्राचीन भारतीय औषधी पद्धती याविषयीचे महत्त्व विशद करून, वनस्पतीचा मानवाच्या दैनंदिन आयुष्यातील औषधी म्हणून होणारा उपयोग त्याचे वास्तव व सत्य याविषयीची मांडणी केली, या सत्रच्या अध्यक्षा डॉ. पूजा सूर्यवंशी वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख बूमरेड्डी महाविद्यालय, बिदर कर्नाटक या होत्या. प्रोफेसर विजय कोठेकर ज्ञानविज्ञान व्याख्यानमालेचे सहावे व शेवटचे सत्राचे प्रमुख व्याख्याते प्रोफेसर नितीन लभाने, वनस्पती शास्त्रविभाग, भवन विज्ञान महाविद्यालय, अंधेरी मुंबई यांनी वनस्पतीच्या जैवविविधतेमध्ये बियांच्या गर्भावस्थेतील होणारे बदल त्यासाठीचे परिणामकारक ठरणारे जैविक घटक व त्यातून निर्माण होणारी जैवविविधता याविषयी सखोल असे मार्गदर्शन केले. या सत्रचे अध्यक्ष प्रोफेसर अनिल भुक्तार , वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख, विवेकानंद विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर हे होते.



प्रोफेसर विजय कोठेकर ज्ञानविज्ञान व्याख्यानमाला २०२६ चा समारोप दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी आभासी पद्धतीने संपन्न झाला. या समारंभाचे अध्यक्ष प्रोफेसर नितीन लभाने यांनी या प्रकारच्या ज्ञानविज्ञानावर आधारित व्याख्यानमाला भविष्यात विद्यार्थी व संशोधनासाठी होणे गरजेचे आहे याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रोफेसर अनिल भूक्तार यांनी ज्ञानविज्ञानातील व्याख्यानमालेतून भविष्यकालीन नवीन संशोधक घडावेत अशा अपेक्षा व्यक्त केल्या. प्रोफेसर विजय कोठेकर ज्ञानविज्ञान व्याख्यानमाला २०२६ चे मुख्य संयोजक प्रोफेसर नवनाथ काशीद, वनस्पतीशास्त्र विभाग, बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज यांनी या व्याख्यानमालेच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केल्याबद्दल श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था आडसचे सचिव श्री रमेशरावजी आडसकर साहेब तसेच तज्ञ संचालिका श्रीमती अर्चनाताई आडसकर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव फावडे यांचे आभार व्यक्त केले. व्याख्यानमालेच्या यशस्वीतेसाठी सहयोगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर , डॉ. ताराचंद होळंबे , डॉ. हेमंत भगवान , डॉ. बळीराम राख , तसेच सहसंयोजक प्रोफेसर संतोष तळेकर , प्रोफेसर ज्योती क्षीरसागर, प्रोफेसर संध्या जोगदंड, प्रोफेसर गणेश पाचकोरे, प्रोफेसर अनिता धारासुरकर , डॉ. प्रकाश देशमुख, डॉ. शीला शिंदे, डॉ. शंकर सानप, डॉ. बाबासाहेब हिरवे, डॉ. श्रीकांत भोसले, श्रीमती अर्चना मुखेडकर, डॉ. विश्वजीत म्हस्के व सहयोगी प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे आभार व्यक्त करून पुढील शैक्षणिक शैक्षणिक वर्षांमध्ये ज्ञानविज्ञान व्याख्यानमाला यशस्वीपणे घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले.

# अनिल जगतापांच्या चंपावती महोत्सवातून स्व.बाळासाहेबांचे कलाकारप्रेम जिवंत-अशोक पटवर्धन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ फेब्रुवारी**



शिवसेना प्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्राच्या कलाक्षेत्राला व कलाकारांना भरभरून प्रेम दिले, त्यांना जपले आणि घडवले. हाच विचार हाडाचा शिवसैनिक असलेल्या शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी चंपावती महोत्सवाच्या माध्यमातून जपला आहे, असे प्रतिपादन शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव मा. अशोकजी पटवर्धन यांनी केले. चंपावती महोत्सवाच्या उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक समूह गीत गायन स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना ते म्हणाले की, कलाकारांचा बालेकिल्ला म्हणून ओळख असलेल्या बीड जिल्ह्यात कलेचे संस्कार रुजवण्याचे काम चंपावती महोत्सवातून यशस्वीपणे सुरू आहे. या माध्यमातून नव्या पिढीतील कलाकार घडत असून याचे मला प्रचंड समाधान आहे.

कलाकारांच्या बालेकिल्ल्याची परंपरा व सांस्कृतिक वारसा पुढे नेत २ फेब्रुवारीपासून सुरू असलेला चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक भव्य-दिव्य स्वरूपात पार पडत असून रसिकांकडून उदंड प्रतिसाद मिळत आहे. या महोत्सवाची दखल घेत मा. अशोकजी पटवर्धन साहेब यांनी चंपावतीच्या रंगमंचावर उपस्थिती लावून महोत्सवाचा गौरव वाढवला. दि. ७ फेब्रुवारी रोजी सकाळी, अनिल दादा जगताप फाउंडेशन व शिवसेना बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गीत गायन स्पर्धेचा उद्घाटन सोहळा अशोकजी पटवर्धन यांच्या शुभहस्ते उत्साहात पार पडला. यावेळी बीड जिल्ह्याचे संगीत रत्न भरत अण्णा लोळगे, सुदर्शन धूतेकर, कलावंत-पत्रकार महेश वाघमारे,संतोष मानूरकर, प्रा.लक्ष्मीकांत बाहेगाव्हाणकर, दत्ताजी देशमुख, अनिताताई भोसले, मराठी महाराष्ट्र चॅनलचे संपादक संग्रामजी धनवे, कलावंत किशोरजी धुताडमाल, पूनमताई धुताडमाल, परीक्षक सौ. धुतेकर मॅडम, परीक्षक मजहरजी शेख सर, शिवसेना बीड विधानसभा प्रमुख सुनिल अनभुले, तालुका प्रमुख संतोष जाधव, आकाश जगताप तसेच प्रतिक कांबळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. सर्व उपस्थित सन्माननीय मान्यवरांनी चंपावती महोत्सव अविरत सुरू राहावा अशी भावना व्यक्त करत आयोजक व सहभागी कलाकारांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांचे खा.रजनीताई पाटील यांच्याकडून सांत्वन

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.८ फेब्रुवारी**



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे विमान अपघातात दुःखद निधन झाले.संपूर्ण महाराष्ट्र शोकाकुल झाला. रविवार रोजी बारामती येथे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांची भेट घेऊन खा.रजनीताई अशोकराव पाटील यांनी सांत्वन केले. यावेळी अश्रू अनावर झाले होते.जुन्या आठवणी मन सुन्न करून गेल्या.

महाराष्ट्राच्या राजकारणात अजित दादा पवार हे स्पष्टवक्तेपणा, परखडपणा यामुळे कायम स्मरणात राहतील.पाटील आणि पवार कुटुंबाचा कायम स्नेह होता.पवार कुटुंबासाठी हा मोठा धक्का आहे. दुःख पेलल्या शिवाय पर्याय नाही ते क्रमप्राप्त आहे अशा भावना व्यक्त झाल्या.



स्व.अमोल गलधर यांच्या जयंतीनिमित्त रविवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात स्व. अमोल गलधर युवा मंच, लिंबागणेश यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात स्व. अमोल गलधर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आली. यावेळी लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. ऋषिकेश आंधळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच डॉ. गणेश ढवळे, सरपंच बालासाहेब जाधव, सेवा सोसायटीचे चेअरमन रविंद्र निर्मळ, पत्रकार हरिओम क्षीरसागर यांनी स्व. अमोल गलधर यांच्या सामाजिक कार्याचा व जनतेसाठी दिलेल्या लढ्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला.

# जवळबन उपकेंद्रातून शेतीसाठी दिवसभर वीज पुरवठा

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.८ फेब्रुवारी**



तालुक्यातील जवळबन वीज उपकेंद्रात सोलर प्लॅन्ट ५ एम व्ही ए कार्यरत झाल्यामुळे परिसरातील आनंदगाव,सारणी, जवळबन शिवारातील शेतकऱ्यांना शेतीसाठी आता दिवसभर मुबलक वीज पुरवठा उपलब्ध होत आहे अशी माहिती उपकेंद्राचे कनिष्ठ अभियंता प्रकाश वैरागे यांनी दिली.

सध्या रब्बी हंगामातील ज्वारी गहू हरभरा ऊस आदी पिकाला पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांना आवश्यक होता. शेतकऱ्यांची मागणी विचारात घेऊन वीज उपकेंद्राकडून सौर प्लांट उभा करण्यात आला आणि याद्वारे आता शेतकऱ्यांना शेतीसाठी थ्री फेज मुबलक असा दिवसभर वीज पुरवठा उपलब्ध होत आहे याबद्दल शेतकऱ्यांनी वीज वितरण कंपनी बद्दल समाधान व्यक्त केले आहे.

यापूर्वी शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळेमध्ये पिकाला पाणी देण्यासाठी अंधाराचा सामना करावा लागायचा यावेळी अनेक अपघात घडून यायचे मात्र आता दिवसभर विद्युत पुरवठा उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांना होणारा त्रास कमी झाला आहे. पिकाला मुबलक पाणी उपलब्ध झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होणार अशा प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी दिल्या. विद्युत पुरवठा नियोजनासाठी वरिष्ठ तंत्रज्ञ डी बी पुरी,आर जी राठोड,एस एस फड यांच्या सहयोगातून शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवल्या जात आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोलीत दयानंद लेले राष्ट्रीय हॉकी स्पर्धेचे थाटात उद्घाटन

## जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ फेब्रुवारी**

तब्बल दहा वर्षानंतर हिंगोलीत हॉकी स्पर्धेला सुरुवात झाली आहे. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता व मान्यवरांच्या उपस्थितीत उदघाटन सोहळा थाटात संपन्न झाला. पहिल्याच सामन्यात मुंबई पोलिसांनी विजय संपादन केला आहे.

हिंगोली येथील जिल्हा परिषदेच्या मैदानावर निमंत्रित हॉकी स्पर्धेला रविवार दि. ८ फेब्रुवारी रोजी सुरुवात झाली. राज्य हॉकी असोसिएशन यांच्या मान्यतेने हिंगोली जिल्हा हॉकी असोसिएशन यांच्या पुढाकाराने डिप्टी कमिशनर पोलीस स्व. दयानंद श्रीलेले सुवर्ण चषक हॉकी स्पर्धेचे उदघाटन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, उपनगराध्यक्ष माबुद बागवान, नगरसेवक जीतसिंग साहू, एलआयसीचे व्यवस्थापक अरूण नंदनकर यांच्यासह रामचंद्रजी कयाल, सुभाषचंद्र तापडिया आदी मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित पाहूण्याचे स्वागत असोसिएशन पदाधिकारी यांनी केले. यानंतर जिल्हाधिकारी गुप्ता यांनी दीप प्रज्वलन करून उदघाटन केले. प्रास्ताविक असोसिएशनचे अध्यक्ष ओमप्रकाश श्रीलेले यांनी केले. यावेळी त्यांनी कठीण परिसरात कठीण परिस्थितीतून तब्बल दहा वर्षानंतर हॉकीचे स्पर्धा आयोजित करण्यात आल्याची माहिती देत, यासाठी निवृत्त कर्मचारी अधिकारी व हॉकी खेळाडू यांनी सहकार्य केल्याचे सांगितले. भविष्यात हॉकीच्या यापेक्षाही भव्य स्पर्धा आयोजित करण्याचा आणि खेळाडू घडवण्याचा माणस त्यांनी व्यक्त केला. यानंतर जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोप जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी करताना हिंगोली जिल्ह्यामध्ये जास्तीत जास्त खेळांच्या ॲक्टिव्हिटी वाढवून खेळाडूंना संधी निर्माण व्हावी यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. नुकत्याच राज्यस्तरीय विविध स्पर्धेचा उल्लेख केला. त्यांनी उपस्थित क्रीडाप्रेमींना मार्गदर्शन करून खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हाधिकारी गुप्ता यांनी असोसिएशन पदाधिकाऱ्यां कौतुक केले. उदघाटन सोहळ्यात या पहिल्या मॅचमध्ये मुंबई पोलीस व ब्रह्मपुरी यांच्या चुरशीचा सामना झाला. या थरारक सामन्यात मुंबई पोलिसांनी दोन एक गोलने विजय संपादन केला. या स्पर्धा दि. १५ फेब्रुवारी पर्यंत सुरू राहणार आहेत. स्पर्धा यशस्वी करीता हिंगोली जिल्हा हॉकी असोसिएशनचे अध्यक्ष ओमप्रकाश श्रीलेले, सचिव प्रकाश वाघमारे, आयुब पठाण, केशव दुबे, कल्याण देशमुख, शैलेश मुदीराज, सचिन शर्मा, शेषराव कराळे , ओमप्रकाश मुदीराज, सुभाष वाघमारे, विशाल मुदीराज, फुलचंद जैस्वाल, श्रीनिवास मंगरूळकर, आशुतोष श्रीलेले, शांताराम मुदिराज,जितेंद्र भट, अनेश तोटे, जितेंद्र गायकवाड, रवी प्रकाश संगेकर, विजय नंदे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# लिगो प्रकल्पासाठीच्या रस्ता रूंदीकरणास शेतकऱ्यांचा विरोध

## भूसंपादन केले नसल्याचा शेतकऱ्यांचा आरोप

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ फेब्रुवारी**

देशातील पहिल्या लिगो प्रकल्पासाठीच्या रस्ता रूंदीकरणासाठी तीन गावातील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शविला असून आधी भूसंपादन करा मगच रस्ता करू देणार अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे. या प्रकारामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाची मोठी अडचण झाली आहे. तर दुसरीकडे महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी दि ४ फेब्रुवारी रोजी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला मात्र शेतकरी भूमिकेवर ठाम आहेत.

देशातील पहिला लिगो प्रकल्प औंढा नागनाथ तालुक्यातील दुधाळा शिवारात होत आहे. त्यासाठी सुमारे २०० हेक्टर जमीन संपादीत करण्यात आली आहे. सन २०३० पर्यंत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे लिगो प्रकल्प कार्यालयाचे प्रयत्न असून त्यासाठी केंद्र शासनाने २६०० कोटी रूपयांचा निधी देखील मंजूर केला आहे.

मात्र प्रकल्प सुरू करण्यापूर्वी त्याठिकाणी पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. त्यासाठी बोरजा फाटा ते दुधाळा असा सुमारे दहा किलोमीटर अंतराचा रस्ता तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मार्गदर्शनाखाली रस्त्याचे काम केले जात आहे. परंतु सध्या असलेल्या ४० फुटाच्या रस्त्याचे आणखी ४० फुट रूंदीकरण करून ८० फुट रस्ता तयार केला जात आहे. मात्र यामध्ये बोरजा, दुधाळा, पिंपळा या भागातील शेतकऱ्यांच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूने २० फुट वहिती असलेली जमीन जात आहे. या प्रकारामुळे या गावातील शेतकऱ्यांनी रस्ता रूंदीकरण व बांधकामाला विरोध दर्शविला आहे. रस्त्यासाठी जमीनीचे भूसंपादन करून त्याचा मोबदला द्यावा मगच रस्ता रूंदीकरण करावे अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे. या मागणीसाठी शेतकरी आक्रमक झाले असून त्यामुळे बांधकाम विभागाने काम बंद केले आहे. त्यानंतर बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी महसूल विभागाला पत्र दिले असून शेतकऱ्यांच्या विरोधामुळे काम बंद करावे लागत असल्याचे पत्रात नमुद केले आहे.

या प्रकरणात वसमतचे उपविभागीय अधिकारी विकास माने, औंढा नागनाथचे तहसीलदार हरिश गाडे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. मात्र शेतकरी त्यांच्या भूमिकेवर ठाम आहेत. यावेळी अधिकाऱ्यांनी रस्ता ८० फुटाचा असल्याचे सांगितले परंतु भूसंपादन झाले नसतांना रस्ता ८० फुटाचा कसा झाला असा सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला. त्यामुळे या बैठकीत कुठलाही तोडगा निघाला नाही. लिगो प्रकल्प हा देशासाठी महत्वपूर्ण प्रकल्प आहे. हिंगोली जिल्ह्याचे नाव आंतरराष्ट्रीय नकाशावर आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी सहकार्य करावे असे आवाहन माने यांनी केले आहे.

# व्यापाऱ्यांची २३ लाखांची हळद घेवून ट्रक चालक बेपत्ता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ फेब्रुवारी**

शहरातील दोन हळद व्यापाऱ्यांची २३.५० लाख रूपये किंमतीची ६०६ कट्टे हळद घेवून ट्रक चालक बेपत्ता झाल्याचा प्रकार उघड झाला असून याप्रकरणी मध्य प्रदेशातील एका ट्रक चालकाविरूध्द शहर पोलिस ठाण्यात शनिवारी फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी ट्रक चालकाचा शोध सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली शहरातील संतोष भक्कड व कार्तिक चेपूरवार हे व्यापारी हळद खरेदी विक्रीचा व्यवसाय करतात. त्यांनी खरेदी केलेली हळद बिहार राज्यातील गया येथील माँ शक्ती ट्रेडर्स या व्यापाऱ्याला हळद विक्री केली होती. त्यानुसार विक्री केलेली हळद नेण्यासाठी मध्य प्रदेशातील बारीगठ येथील ट्रक चालक शिवम बेलदार हा ट्रक घेवून आला होता.

हिंगोली येथील औद्योगिक वसाहतीमधून तसेच आदर्श महाविद्यालयाच्या परिसरातील असलेल्या गोदामातून २३.५० लाख किंमतीची ६०६ हळदीचे कट्टे दि २९ जानेवारी रोजी ट्रकमध्ये भरण्यात आली होती. यामध्ये भक्कड यांच्या मालकीचे ९.३४ लाख रूपये किंमतीची २०० कट्टे तर चेपूरवार यांच्या मालकीची १४.१६ लाख किंमतीची ४०६ हळदीचे कट्टे होते.

सदर ट्रकमध्ये हळद भरल्यानंतर ट्रक बिहारकडे निघाला. मात्र किमान चार दिवसात ट्रक बिहार येथे पोहचणे अपेक्षित असतांना अद्यापही ट्रक तेथे पोहोचलाच नाही. त्यामुळे व्यापारी भक्कड व चेपूरवार यांनी ट्रक चालकाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला मात्र त्याच कुठेही शोध लागला नाही. शिवाय मोबाईलही बंद होता. काही दिवस वाट पाहिल्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच व्यापारी भक्कड व चेपूरवार यांनी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

यावरून पोलिसांनी ट्रक चालक शिवम बेलदार रा वारीगढ जि छतरपूर मध्यप्रदेश याच्याविरूध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिस निरीक्षक संदीप मोदे, सहाय्यक पोलिस निरीक्षक आनंद बनसोडे, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक संजय मार्के, जमादार अशोक धामणे, संतोष करे, गणेश लेकुळे, शिवाजी ठोंबरे, शेख मुजीब यांच्या पथकाने ट्रक चालकाचा शोध सुरू केला असून त्यासाठी पथकेही रवाना केली आहेत.



**हिंगोली– येथील बहुविध प्रशालेच्या मैदानावर सुरू असलेल्या दयानंद श्रीलेले राष्ट्रीय हॉकी स्पर्धेत मुंबई पोलिस विरूध्द ब्रम्हपुरी या दोन संघात चुरशीचा सामना झाला. या सामन्यांतील खेळाडूंचा चुरशीचा प्रसंग छायाचित्रकाराने टिपला. सामना पाहण्यासाठी प्रेक्षकांची गर्दी दिसत आहे. छाया– विजय गुंडेकर**

# शहरात अल्पवयीन मुलांची दुचाकीवर सुसाट धूम

## पालक, वाहतुक शाखेकडून डोळेझाक, अपघातांना निमंत्रण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ फेब्रुवारी**



शहरात सध्या १८ वर्षांखालील मुलांकडून सर्रासपणे दुचाकी चालवल्या जात असल्याचे चित्र दिसत आहे. विशेषतः शाळा आणि शिकवणी वर्गांच्या परिसरात शालेय विद्यार्थ्यांची ही 'बेशिस्त' वाहतूक शिस्तीचे धिंडवडे काढत आहे. डबल, ट्रीपल सीट दुचाकीवर सुसाट चालवित असतांना दिसत आहेत. या अल्पवयीन मुलांच्या पालकांना याचे गांभीर्य लक्षात आणून देण्यासाठी पोलिस वाहतुक शाखेकडून कसलीच कार्यवाही होत नसल्यामुळे शहरात अपघातांना निमंत्रण देण्याची वाट वाहतुक शाखा पहात आहे का असा सवाल सर्व सामान्य नागरिकांमधून विचारल्या जात आहे.

शहरात १८ वर्षे खालील मुले, मुली सर्रासपणे शाळा आणि महाविद्यालयामध्ये दुचाकी आणत आहेत. शाळा, महाविद्यालय प्रशासनाने बजावल्यानंतरही ही मुले दुचाकी शाळा, महाविद्यालयाच्या बाहेर वाहने उभी करीत आहेत. काहीजण बस स्थानकापासून ते शाळा महाविद्यालयापर्यंत मुलींचा पाठलाग दुचाकीवर करीत असतांना दिसत आहेत. वाहने चालवितांना डबल, ट्रीपल सिट बसून स्टंटबाजी करीत असतांना दिसत आहेत. यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता आहे. या मुलांचे पालक त्यांना दुचाकी देतात कसे हा कळीचा मुद्दा असून अशा पालकांना आणि अल्पवयीन मुलांना धडा शिकवण्यासाठी पोलिस वाहतुक शाखेने अल्पवयीन वाहन चालविणाऱ्या मुलामुलींवर कार्यवाही करून त्यांच्यासह पालकांना समज देण्याची आवश्यकता आहे. या गंभीर प्रकाराकडे स्थानिक वाहतूक शाखा सोयीस्कर दुर्लक्ष करत असल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. अनेक विद्यार्थी वेगाने गाड्या चालवणे, विनाहेल्मेट फिरणे आणि रस्त्यावर स्टंटबाजी करणे यांसारखे प्रकार करत आहेत. यामुळे पादचारी आणि इतर वाहनधारकांना आपला जीव मुठीत धरून चालावे लागत आहे. हिंगोली शहरातील मुख्य चौक आणि वर्दळीच्या ठिकाणी वाहतूक पोलीस तैनात असतात. मात्र, गणवेशात असलेल्या शालेय विद्यार्थ्यांना अडवून त्यांच्याकडे परवान्याची विचारणा करताना पोलीस प्रशासन फारसे दिसत नाही. पोलिसांच्या दुर्लक्षामुळे अल्पवयीन मुलांचे धाडस अधिकच वाढत असल्याचे बोलले जात आहे.

# हिंगोलीत किरकोळ कारणावरून दोघांवर चाकूने वार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ फेब्रुवारी**

शहरातील हरण चौकात किरकोळ कारणावरून दोघांवर चाकूने वार करून तसेच लोखंडी रॉडने मारहाण करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पाच जणांवर हिंगोली शहर पोलिस ठाण्यात शनिवारी रात्री गुन्हा दाखल झाला आहे. या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या दोघांना उपचारासाठी रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली शहरातील तलाब कट्टा भागातील सय्यद वसीम यांचा अब्बास कुरेशी याच्यासोबत किरकोळ कारणावरून वाद झाला होता. त्यानंतर सय्यद वसीम हे शुक्रवारी दि ६ रोजी शहरातील हरण चौक भागात आले असतांना पेन्शनपुरा भागातील अब्बास कुरेशी, महेफुज कुरेशी, शेख आदील कुरेशी, जुनेद कुरेशी, शोएब कुरेशी हे पाच जण त्याठिकाणी आले. त्यांनी सय्यद वसीम यांच्यासोबत पुन्हा वाद उकरून काढला. शाब्दीक चकमकीनंतर हाणामारीला सुरूवात झाली. या हाणामारीत अब्बास कुरेशी याने लोखंडी रॉडने सय्यद वसीम यांना मारहाण केली. तसेच इतरांनी त्यांच्या हातातील चाकूने सय्यद वसीम यांच्या डोक्यात वार केले. या प्रकाराची माहीती मिळाल्यानंतर सय्यद वसीम यांचे भाऊ सय्यद कलीम हे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनाही पाच जणांनी लोखंडी रॉडने मारहाण केली तसेच त्यांच्यावर चाकूने वार केले. या मारहाणीत सय्यद वसीम व सय्यद कलीम दोघेही गंभीर जखमी झाले. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

या घटनेची माहीती मिळताच शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप मोदे, सहाय्यक पोलिस निरीक्षक आनंद बनसोडे, सहाय्य पोलिस उपनिरीक्षक संजय मार्के, जमादार अशोक धामणे, शेख मुजीब, संतोष करे, गणेश लेकुळे, ठोंबरे यांच्या पथकाने तातडीने धाव घेतली. या मारहाणीत जखमी झालेल्या दोघांना उपचारासाठी रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी सय्यद वसीम यांच्या तक्रारीवरून पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे या परिसरात काही काळ वातावरण तणावपूर्ण बनले होते.

## संक्षिप्त वृत्त

### पोलिस पाटील भरतीच्या लेखी परीक्षांना गर्दी



हिंगोली– जिल्हा प्रशासनाच्यावतीने रविवारी शहरातील जिल्हा परिषद कन्या प्रशाला आणि माणिक स्मारक आर्य विद्यालयात पोलिस पाटील भरतीसाठी लेखी परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. या परीक्षेसाठी जिल्ह्यातून अनेक उमेदवार परीक्षेसाठी दाखल झाले होते. यावेळी परीक्षा केंद्रावर चोख पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. उमेदवारांची तपासणी करूनच उमेदवारांना परीक्षा केंद्रात प्रवेश देण्यात येत होता. जिल्हा प्रशासनाच्यावतीने जिल्ह्यातील हिंगोली, कळमनुरी तसेच वसमत तालुक्यात पोलिस पाटील भरतीसाठी अनेक उमेदवारांनी अर्ज भरले होते. यामध्ये उच्च शिक्षितांनीही परीक्षेला हजेरी लावल्याचे दिसून आले.

# हिंगोलीत सावित्रीच्या लेकीच्या पुढाकारातून शिवजयंती महोत्सव

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ फेब्रुवारी**

सावित्रीच्या लेकी आम्ही ही ओळ आद्यशिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वारसा सांगणारी आहे. याचा अर्थ महिलांनी शिक्षणाद्वारे स्वतःचे अस्तित्व निर्माण केले असून, अंधश्रद्धा, अनिष्ट प्रथा मोडून, स्वावलंबी होऊन शिक्षण आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या जोरावर प्रत्येक क्षेत्रात प्रगती केली आहे यावर्षी हिंगोलीत महिलांच्या पुढाकारातून सार्वजनिक शिवजयंती महोत्सव उत्साहात साजरा केला जाणार असून त्याची जय्यत तयारी सुरू झाली आहे.

सावित्रीबाईंनी सुरू केलेल्या स्त्री शिक्षणाच्या परंपरेमुळे आजच्या स्त्रिया सुशिक्षित आणि स्वावलंबी झाल्या आहेत. आजच्या महिला फक्त घर सांभाळत नाहीत, तर तंत्रज्ञान, कला, शिक्षण यांसारख्या सर्वच क्षेत्रांत पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत. जुन्या रुढी–परंपरांना गाडून स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करण्याची जिद्द आणि समतेचा लढा सुरू ठेवण्याची प्रतिज्ञा म्हणजे सावित्रीच्या लेकी होय

सावित्रीबाईंच्या संघर्षातून प्रेरणा घेऊन आत्मविश्वासाने जगणाऱ्या आणि समाजाला दिशा देणाऱ्या आधुनिक स्त्रिया म्हणजे सावित्रीच्या लेकी आहेत. हिंगोलीत यावर्षीचा सार्वजनिक शिवजयंती महोत्सव महिलांच्या पुढाकारातून होणार आहे. यामुळे सावित्रीच्या लेकी सरसावल्या आहेत शिवजयंती महोत्सवाची धुरा महिलांनी खांद्यावर घेतली आहे.

हिंगोलीत मागील काही दिवसांपासून सार्वजनिक शिवजयंती महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. यावर्षीचा हा महोत्सव आगळावेगळा असून यात समितीच्या पदाधिकाऱ्यांची धुरा महिलांच्या खांद्यावर आहे. सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षा सुनिता मुळे, उपाध्यक्षा विद्या पवार, सचिव रजनी पाटील, कार्याध्यक्षा स्वाती भोयर, कोषाध्यक्षा कांताबाई कल्याणकर यांनी धुरा सांभाळली आहे.

शिवजयंती महोत्सव उत्साहात साजरा करण्यासाठी या सावित्रीच्या लेकीनी महोत्सवाची जय्यत तयारी सुरू केली आहे. जयंती निमित्त विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, महिलांसाठी स्पर्धा. आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून ११ ते १९ फेब्रुवारी पर्यंत भरगच्च कार्यक्रम आहेत. शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमात रामलिला मैदानावर ११ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता क्रिकेट स्पर्धा होईल. सकाळी १० वाजता जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या परिसरात शिवचरित्रावर आधारीत ऑनलाईन परीक्षा होईल. १२ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा परिसरात व्हॉलीबॉल स्पर्धा, तसेच ११.३० वाजता शिवचरित्रावर, ऐतिहासीक छायाचित्रावर विद्यार्थ्यांना माहिती दिली जाईल.

त्यानंतर १३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेसहा वाजता ॲड. पंडितराव देशमुख, क्रीडा संकुल अकोला रोड येथे लॉन टेनिस स्पर्धा, १४ फेब्रुवारी शनिवार रोजी सकाळी ५.३० ते ७ छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा परिसरात थॉयरॉईड, मधुमेहावर मार्गदर्शन होईल. ता. १५ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा परिसरात महिला व मुलांसाठी मॅरेथॉन स्पर्धा तर रात्री ७ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती परिसरात कवि संमेलन होईल. १६ फेब्रुवारी सोमवार रोजी सकाळी ८.३० वाजता स्टडी सर्कल पॉईट गुरुकुल येथे शिवचरित्रावर सामान्य ज्ञान स्पर्धा घेतली जाणार आहे. दुपारी १२ वाजता आनंदनगरी, दुपारी चार वाजता होम मिनीस्टर स्पर्धा होईल. १७ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेनऊ वाजता बालगट व खुल्या गटात वेशभुषा, अभिनय, नृत्य स्पर्धा घेतली जाणार आहे १८ फेब्रुवारी बुधवारी सकाळी १० वाजता वक्तृत्व स्पर्धा, दुपारी चार वाजता महिलांसाठी रांगोळी स्पर्धा होईल. सायंकाळी ६ वाजता दिपोत्सवाचा कार्यक्रम होणार आहे. रात्री ७ वाजता सांस्कृतीक कार्यक्रम व तीन दिवशीय स्पर्धांचा समारोप होईल. सदर सर्व कार्यक्रम छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात होणार आहेत. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा परिसरात शिव अभिषेक होणार आहे. सकाळी ७ वाजता ध्वजारोहण, ८ वाजता शिव पाळणा, शिवपुजन व शिव गजर होणार आहे. १० वाजता रक्तदान शिबीर घेतले जाईल. त्यानंतर शहरातून भव्य मिरवणुक काढली जाणार आहे.

या कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरू झाली असुन महिलांनी यासाठी पुढाकार घेतला आहे त्यांना यासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



# खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीस बारा तासात अटक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ८ फेब्रूवारी-**

जुन्या भांडणाच्या कारणावरुन युवकाचा खुन करणाऱ्या आरोपीस स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने बारा तासात अटक केली असून, त्यास ग्रामीण पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

नांदेड तालुक्यातील पुयडवाडी येथील आकाश बालाजी पुयड याचा दि.७ फेब्रुवारी रोजी खुन करण्यात आला होता. या खुनाच्या तपासासाठी स्थानिक गुन्हे शाखेने दोन पथके तैनात केली. दि.८ फेब्रुवारी रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे आरोपीचा शोध घेत असताना या गुन्ह्यातील आरोपी पवन माणिका पुयड हा डॉ.शंकरराव चव्हाण चौकाजवळील पुलाखाली थांबलेला असल्याची माहिती मिळाल्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून त्यास अटक केली. त्याची चौकशी केली असता त्याने त्याच्या पाच साथीदाराच्या मदतीने जुन्या भांडणाच्या कारणावरुन आकाश बालाजी पुयड याचा खुन केल्याची कबुली दिली. या प्रकरणी पवन माणिका पुयड यास अटक करुन त्यास ग्रामीण पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले तर इतर आरोपीचा शोध घेण्यात येत आहे. हि कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे, पोलीस उपनिरीक्षक नागनाथ तुकडे, पोलीस अंमलदार दारासिंग राठोड, पोहेकॉ. सिध्दू सोनसळे, श्रीराम दासरे, माधव माने, संघरत्न गायकवाड, आभाराव पिंगलवाड, लहु चाटे, विश्वनाथ पवार, सुधाकर देवकत्ते यांच्या पथकाने केली.

# माहूर कृउबाला नवीन शेतकरी भवनासाठी दिड कोटी रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता; आ. केराम यांचे प्रयत्न फळाला

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ८ फेब्रूवारी-**

माहूर येथे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये (कृउबा) सुसज्ज शेतकरी भवनाअभावी शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत होती.शेतकरी हा पोशिंदा असूनही, त्यांना बाजार समितीमध्ये मूलभूत सुविधा मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागत असे.आता हा संघर्ष संपणार असून महाराष्ट्र शासन सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडून कृषि उत्पन्न बाजार समिती, माहूर येथे नवीन शेतकरी भवन बांधण्याच्या १ कोटी ५२ लाख ७१ हजार २४७ एवढ्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.याकामी शेतकऱ्यांचे हित जोपासरारे विकासप्रिय स्थानिक आमदार भीमराव केराम यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा व प्रयत्नांना मिळालेले हे मोठे यश असल्याचे मत सभापती दत्तराव मोहिते यांनी व्यक्त केले आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन या योजनेंतर्गत राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती असलेल्या ठिकाणी शेतकरी बांधवांना मुक्कामाची सोय व्हावी, तसेच, शेतकऱ्यांच्या मूलभूत सुविधा देखील त्याच ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात या दृष्टीने ज्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकरी भवन उपलब्ध नाही तेथे नवीन शेतकरी भवन बांधणे, तसेच, ज्या बाजार समितीच्या परिसरात शेतकरी भवन अस्तित्वात आहे परंतु सुस्थितीत नाही, अशा शेतकरी भवनाची दुरुस्ती करणे यासाठी शासन अनुदान उपलब्ध करुन देण्यासाठी दि.१९.१२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

सदर योजनेंतर्गत पणन संचालक, पुणे यांनी कृषि उत्पन्न बाजार समिती, माहूर येथे नवीन शेतकरी भवन बांधण्याच्या एकूण रु.१५२.७१ लक्ष इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यावरुन कृषि उत्पन्न बाजार समिती, माहूर येथे नवीन शेतकरी भवन बांधण्यासाठी बाजार समितीने तयार केलेल्या रु.१,५२,७१,२४७/- (अक्षरी रुपये एक कोटी बावन्न लक्ष एकाहत्तर हजार दोनशे सतेचाळीस फक्त) एवढ्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.त्यासंदर्भातील शासन निर्णय ०२ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर झाला आहे.



कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये (कृउबा) सुसज्ज शेतकरी भवनाअभावी शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होते. मालाची विक्री होईपर्यंत उघड्यावर, धुळीत किंवा पावसात मुक्काम करावा लागतो. रात्रीची सुरक्षितता नसते, तर महिला व कुटुंबासह आलेल्या शेतकऱ्यांची पिण्याच्या पाण्यापासून स्वच्छतागृहांपर्यंतची गैरसोय होते, ज्यामुळे शेतकरी हवालदिल होतात.

त्यादृष्टीने महाराष्ट्रातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये (एपीएमसी) अत्याधुनिक सुविधा पुरवण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या सोयीसाठी नवीन शेतकरी भवन बांधण्याच्या अंदाजपत्रकास राज्य शासनाकडून प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. तत्कालीन उपमुख्यमंत्री स्व.अजित पवार यांनी आश्वासन दिल्याप्रमाणे, राज्यातील बाजार समित्यांचे आधुनिकीकरण आणि शेतकरी भावनांच्या बांधकामासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे.यामुळे शेतकऱ्यांसाठी राहण्याची चांगली सोय होऊन, बाजार समित्यांचे कार्य अधिक सक्षम होणार आहे.

माहूर येथे मंजूर नवीन कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये (एपीएमसी) 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन' योजना राबवून शेतकऱ्यांसाठी निवारा व सुविधा केंद्र उभारला जाणार आहे. याठिकाणी शेतकऱ्यांसाठी निवास, जेवण, आणि विश्रांतीची सोय केली जाणार आहे.

शेतकरी भवन (एपीएमसी) मध्ये शेतमाल विकायला आणलेल्या शेतकऱ्यांसाठी हक्काचा निवारा.अल्प दरात जेवणाची सुविधा. बाजारभावाची माहिती आणि एसएमएस सुविधा. तसेच टिन शेड, पिण्याचे पाणी, शौचालय आणि सीसीटीव्ही सुरक्षा आदी सुविधा उपलब्ध होणार आहेत.

माहूर कृउबाला आ. केराम यांनी शासनाकडून नवीन शेतकरी भवन मंजूर करवून घेण्यात महत्वाची भूमिका बजावली. अर्थात त्यामुळेच शेतकऱ्यांचे हित जोपासणारे लोकप्रतिनिधी शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी समर्पित होणारे विकासपुरुष आ.भीमराव केराम यांसारखे नेते शेतकऱ्यांचे हित जोपासण्याचे काम करत असल्याचे मानले जाते. आणि त्यामुळेच आ. केराम सारखे लोकप्रतिनिधी शेतकरी हा 'जगाचा पोशिंदा' असल्यामुळे त्यांचे कल्याण हे देशाच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे मानतात, हे यावरून स्पष्ट दिसून येते. आ.केराम यांच्या सारखा आदर्श लोकप्रतिनिधी हा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सतत झटणारा, गोरगरिबांसाठी तत्पर आणि शिवरायांचे विचार आचरणात आणणारा आहे. आणि म्हणूनच जो स्वतःला जनतेचा मालक नाही तर 'सेवक' समजतो, तोच खरा लोकप्रतिनिधी होय! अशा कृतज्ञतापूर्वक भावना कृउबा सभापती मोहिते यांनी माहूर कृउबाला नवीन शेतकरी भवन मंजूर करण्यात महत्वाची भूमिका बजावणारे आ. केराम व राज्य शासनाचे आभार मानत व्यक्त केल्या आहेत.

**माहूर कृउबाला आर्थिक विवंचनेतून बाहेर काढणार : आ. केराम**

सर्वसमावेशक विकासच शास्वत असतो. किनवट माहूर मतदार संघातील शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मी कधीच पक्ष भेद न करता सर्वांना सोबत घेऊन फक्त विकास-विकास हेच एकमेव ध्येय्य डोळ्यासमोर ठेवून कार्य करीत आहे. माहूर हे तिर्थक्षेत्राचे ठिकाण असून, येथील नागरिकांचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हितासाठी योग्य निर्णय व विकासात्मक कार्य करुन, बाजार समितीला आर्थीक विवंचनेतुन नक्कीच बाहेर काढणार असल्याचे आ.भीमराव केराम म्हणाले.

## माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचा यज्ञविधीत सहभाग

**नवीन नांदेड** -श्री गुरू दशमुख आश्रम, भिमाशंकरनगर गोपाळचावडी येथील ५ फेब्रुवारी ते १२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत गोपाळचावडी येथे १०८ महायज्ञास माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी दिनांक ७ फेब्रुवारी रोजी होमहवन पुजापाट करून जगद्गुरु श्री भीमाशंकर शिवाचार्य यांचा आशीर्वाद घेतला. श्री गुरू दशमुख आश्रम, भिमाशंकरनगर गोपाळचावडी येथील ५ फेब्रुवारी ते १२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत गोपाळचावडी येथे १०८ आयोजित महायज्ञास दिनांक ७ फेब्रुवारी रोजी राजाचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी महायज्ञ होम हवन पूजा पाठ करून या जगत गुरु श्री भिमाशंकर शिवाचार्य महाराज यांचा आशीर्वाद घेतला.विश्वशांती महायज्ञ आणि श्री केदारनाथ रावळ जगद्गुरू पट्टाभिषेक रजत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. सदरील धार्मिक कार्यक्रमाच्या अनुषंगाने परमेश्वराचे साक्षात दर्शन परिसरातील भाविक भक्तगण घेत आहेत.या महायज्ञाच्या अनुषंगाने माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी येथे जमलेल्या संत महंतांचे दर्शन केले. त्यानंतर या परिसरात नटलेले केदारनाथ मंदिर, शिवमुर्ती व शिवलिंग अशा पवित्र परिसर नटलेल्या परिसराची पाहणी केली. यावेळी अमर राजूरकर, किशोर स्वामी, बालाजी पांडागळे यांची उपस्थिती होती.



# बिलोली पोलिसांची धडक कारवाई ; ४० लाखांच्या मुद्देमालासह अवैध रेती वाहतूक करणारा हायवा जप्त

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. ८ फेब्रूवारी-**

राज्यातील अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीविरोधात पोलीस प्रशासनाने कंबर कसली असून, बिलोली पोलिसांनी सगरोळी ते नरसी रोडवर धाडसी कारवाई केली आहे. या कारवाईत विनापरवाना रेती वाहतूक करणारा हायवा टिप्पर पकडण्यात आला असून, एकूण ४० लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी अवैध धंद्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुषंगाने बिलोली पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीमती कमल शिंदे व त्यांचे पथक हद्दीत गस्त घालत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली. ५ फेब्रुवारी रोजी रात्री १०:२५ च्या सुमारास सगरोळी ते नरसी रोडवरील अतिथी बार जवळ एक संशयास्पद हायवा टिप्पर (क्र. MH ५५ C ९०००) येताना दिसला. पोलिसांनी वाहन थांबवून तपासणी केली असता, त्यात सुमारे ०७ ब्रास रेती मिळून आली. वाहनचालकाकडे रेती वाहतुकीचा कोणताही अधिकृत परवाना नसल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी ४० लाख रुपये किमतीचा हायवा आणि ३५ हजार रुपयांची रेती असा एकूण ४० लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी वाहनचालक रविंद्र फुलसिंग पवार (वय ३२ वर्षे, रा. रामन तांडा महाडोणगाव, ता. औराद जि. बिटर) याला ताब्यात घेण्यात आले असून, बिलोली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. ही कारवाई सपोनि कमल शिंदे, पोउपनि सुरजकुमार तिडके, पोहेकॉ मुदेमवार, पोलीस अंमलदार आंबुरे व धुपतवाड यांच्या पथकाने केली. या यशस्वी कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षकांनी बिलोली पोलीस पथकाचे विशेष कौतुक केले आहे.

# ईळेगाव गोदावरी नदीपात्रातून रात्रंदिवस २५ तराफ्यांवरून वाळू उपसा सुरु उमरीचा महसूल विभागा 'मुग गिळून गप्प'

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ८ फेब्रूवारी-**

तालुक्यातील उमरी पोलीस ठाणे हद्दीतील ईळेगाव गावाजवळील गोदावरी नदीपात्रातून रात्रंदिवस अवैध वाळू उपसा सुरू असून, प्रशासनाच्या डोळ्यांदेखत नदीचा अक्षरशः बळी घेतला जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे दररोज विस ते पंचवीस तराफ्यांच्या सहाय्याने खुलेआम वाळू उपसा केला जात असताना संबंधित महसूल विभाग , पोलीस व पर्यावरण विभागाचे अधिकारी दरमहा ठरल्या प्रमाणे मिळत असलेल्या आर्थिक लाभापोटी मूग गिळून गप्प बसले आहेत.

गोदावरीसारख्या पवित्र नदीचे अस्तित्व धोक्यात घालणारा हा प्रकार अनेक महिन्यांपासून सुरू असून, नदीपात्र खोलवर पोखरले जात आहे. यामुळे नदीकाठची शेती, पाणीपुरवठा योजना,



तसेच पूरस्थितीचा धोका वाढला आहे. स्थानिक नागरिकांनी अनेकदा तक्रारी करूनही कारवाई शून्यच असल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत वाळू माफिया अधिकच सक्रिय होत असून, पोलिस गस्त व महसूल यंत्रणा केवळ कागदावरच अस्तित्वात असल्याचे चित्र आहे. हा प्रकार थांबविण्याऐवजी काही अधिकारी वाळू माफियांना संरक्षण देत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत असुन गरीबावर कायदा, माफियांवर मेहेरबानी? असा संतप्त सवाल हुसा परिसरातील नागरिक उपस्थित करत असून, तात्काळ मोठी कारवाई करून दोषी अधिकारी व वाळू माफियांवर गुन्हे दाखल करावेत, अशी जोरदार मागणी होत आहे.

या गंभीर प्रकरणाकडे जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांनी तातडीने लक्ष देऊन विशेष पथक नेमावे, अवैध तराफे जप्त करावेत व महसूलपोलीस यंत्रणेतील जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करावी, अन्यथा नागरिक आंदोलनाच्या मार्गावर जाण्याचा इशारा देत आहेत. गोदावरी वाचवायची की माफियांना पाठीशी घालायचे? प्रशासन आता तरी जागे होणार का? असा संतप्त सवाल सर्व सामान्य नागरिकांतून जोर धरत आहे.

## रामलिंग देवस्थान येथे भव्य अध्यात्मिक सोहळ्याचे आयोजन

**देगलूर-** महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त श्री रामलिंग देवस्थान, रामपूर ( प.हो.) ता. देगलूर, जि. नांदेड येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील लक्ष्मण शक्ती व अखंड हरिनाम सप्ताहाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. आज दि. ९ फेब्रुवारी २०२६ (सोमवार) ते १६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत हा धार्मिक व अध्यात्मिक सोहळा भक्तिभावाने संपन्न होणार असून संपूर्ण परिसर शिवनामाने दुमदुमणार आहे. या आध्यात्मिक सोहळ्याचे संयोजन ह. भ. प. गुंडप्पा महाराज रामपुरकर यांनी केले आहे. देगलूर तालुक्यातील रामपुर येथील श्री रामलिंग देवस्थान हे अत्यंत पुरातन, ऐतिहासिक व पवित्र असून अनेक ऋषीमुनी, साधुसंत व साधकांच्या तपश्चर्येने पुण्यभूमी म्हणून ओळखले जाते. याच पवित्र स्थानी भाविकांच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून, महाराष्ट्रासह तेलंगणा व कर्नाटक राज्यातील नामांकित कीर्तनकार, भजनी मंडळी व वादकांची उपस्थिती लाभणार आहे. महाशिवरात्रीच्या पूर्वसंध्येला रविवार दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता 'लक्ष्मण शक्ती' कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास परिसरातील प्रमुख वाचक, सुचक व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून, या दिवशी अन्नदानाचा मान शेषेराव हुलबा पाटील इंगोले, रामपूर यांना लाभला आहे. सर्व शिवभक्त व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या भक्तीमय, अध्यात्मिक व पुण्यदायी सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन देवस्थान समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



# हिमायतनगरात महावितरणच्या अनधिकृत कामकाजावर प्रशासनाची धडक कारवाई

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. ८ फेब्रूवारी-**

तालुक्यात रोहित्राच्या अनधिकृत बसवणुकीचा गंभीर प्रकार उघडकीस आल्यानंतर महावितरण प्रशासनाने तात्काळ धडक कारवाई केली आहे. संबंधित रोहित्र तसेच विद्युत लाईनचे कंडक्टर काढून उपविभागीय कार्यालयात जप्त करण्यात आले असून, या प्रकरणात जबाबदार धरलेल्या दोन कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात आले आहे. यासोबतच संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे.

या कारवाईबाबत महावितरणकडून देण्यात आलेले लेखी आश्वासनपत्र मिळाल्यानंतर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब रावणगावकर, महविरचंद श्रीश्रीमाळ, नगरसेवक सुभाष बलपेलवाड यांच्या उपस्थितीत ७ फेब्रुवारी (शनिवार) रोजी अमरण उपोषण मागे घेण्यात आले.

या प्रकरणाविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वामनराव पाटील वडगावकर यांनी ३ फेब्रुवारी २०२६ पासून हिमायतनगर उपविभागीय कार्यालयासमोर अमरण उपोषण सुरू केले होते. सलग पाच दिवस चाललेल्या आंदोलनाची प्रशासनाने गंभीर दखल घेत ६ फेब्रुवारी २०२६ रोजी महावितरणचे वरिष्ठ व उपविभागीय अधिकारी यांनी प्रत्यक्ष भेट देत तक्रारदारांशी दोन ते तीन तास सविस्तर चर्चा केली. या बैठकीस स्थानिक प्रशासकीय अधिकारी, प्रतिष्ठित नागरिक तसेच नगराध्यक्ष व नगरसेवक उपस्थित होते.

प्राथमिक चौकशीत अनियमितता व सेवा नियमांचा भंग झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर संबंधित क्तऊड रोहित्र काढून जप्त करण्यात आले. निष्काळजीपणा व नियमभंगप्रकरणी दोन कर्मचाऱ्यांवर महावितरण सेवा नियमांनुसार निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. चौकशीत आणखी अधिकारी किंवा कर्मचारी दोषी आढळल्यास त्यांच्यावरही कठोर शिस्तभंगात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

# कुवेतमध्ये भारतीय तरुणाचा संशयास्पद मृत्यू; नांदेडच्या कुटुंबीयांची चौकशीसाठी भारतीय दूतावासाकडे मागणी

**तभा वृतसेवा**
**मुक्रमाबाद, दि. ८ फेब्रूवारी-**

कुवेत येथे वास्तव्यास असलेल्या एका भारतीय नागरिकाचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाल्याची गंभीर घटना समोर आली असून, या प्रकरणी सखोल आणि निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी मागणी मृताच्या कुटुंबीयांनी केली आहे. नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील बिहारपूर येथील रहिवासी शेख जुबेर महम्मदसब शेख (वय अंदाजे ३०) यांचा ४ फेब्रुवारी २०२६ रोजी कुवेतमध्ये मृत्यू झाला.



मृत शेख जुबेर हे भारतीय पासपोर्ट क्रमांक झ३४२७६९९ चे धारक होते. कुटुंबीयांना मिळालेल्या माहितीनुसार, त्यांचा मृत्यू नैसर्गिक नसून संशयास्पद परिस्थितीत झाल्याचे संकेत मिळत आहेत. घटनेभोवती अनेक विसंगती आढळून येत असल्याने, हा मृत्यू अपघाती नसून घातपाताचा असण्याची शक्यता कुटुंबीयांनी व्यक्त केली आहे.

या पार्श्वभूमीवर मृताचे वडील मोहम्मदसब शेख यांनी भारतीय दूतावास, कुवेत यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठवून तातडीने हस्तक्षेप करण्याची विनंती केली आहे. संबंधित निवेदनात कुवेतमधील स्थानिक प्रशासनाशी समन्वय साधून मृत्यूचे नेमके कारण शोधण्यासाठी सखोल चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. शेख जुबेर यांच्या कुटुंबीयांवर या घटनेमुळे मोठा मानसिक आघात झाला असून, त्यांना न्याय आणि सत्य समोर यावे, यासाठी भारतीय दूतावासाने हा विषय उच्च प्राधान्याने घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

दरम्यान, या प्रकरणाची चौकशी सुरू होणार का, तसेच भारतीय दूतावासाकडून कोणती पावले उचलली जातात, याकडे नांदेड जिल्ह्यासह राज्याचे लक्ष लागले आहे.

## बिलोलीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण

**बिलोली-** बिलोली शहरातील नवीन बसस्थानक शेजारी असलेल्या विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे भव्य सुशोभीकरणाचे काम करण्यात येणार आहे.लोकनियुक्त नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांच्या पुढाकारातून करण्यात आलेल्या या कामाचे भूमिपुजन माता रमाई जयंतीचे औचित्य साधून मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. बिलोली शहरातील बसस्थानक शेजारी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णकृती पुतळा आहे.सन २०२१ मध्ये लोकनियुक्त नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांच्या पुढाकारातून अवघ्या तेरा दिवसामध्ये भव्य पूर्णकृती पुतळा उभा राहिला.अनेक दिवसांपासून पुतळ्याच्या सुशोभीकारण करण्याची आंबेडकरवादी अनुयायांची मागणी होती. नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांनी पुढाकार घेवून पुतळ्याचे सुशोभीकरण करण्याचे काम हाथी घेतले असून आज शनिवारी माता रमाई जयंती चे औचित्य साधून कामाचे भूमिपूजन करण्यात आले.भूमिपूजन प्रसंगी लोकनियुक्त नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी, उपाध्यक्ष अनुप अंकुशकर, माजी नगराध्यक्षा तथा नगरसेविका मैथिली कुलकर्णी, जेष्ठ पत्रकार तथा नगरसेवक प्रतिनिधी प्रकाश पोवाडे, नगरसेविका अनुपमा गायकवाड, नगरसेवक अब्दुल फिरदोस, वसीम बेग इनामदार, शिवाजी गायकवाड, राजू कुडके, गंगाधर पुपलवार, पत्रकार धम्मपाल जाधव, महेंद्र गायकवाड, मुकिंदर कुडके, किरण लघुळकर, बाळासाहेब लाखे, शेख इलियास, शिलानंद बुद्धेवार यांच्यासह आंबेडकर अनुयायांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# नांदेड येथे सुपर मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटलवर शिक्कामोर्तब; खा. डॉ. अजित गोपछडे यांचा यशस्वी पाठपुरावा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ८ फेब्रूवारी-**

नांदेड येथे २०० खाटांचे सुपर मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल सुरू करण्यात यावे अशी मागणी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केंद्रीय आरोग्य आणि परिवार मंत्री जे.पी नड्डा यांच्याकडे दिनांक २७ जानेवारी २०२५ रोजी केली होती. त्यानंतर आजही या मागणीसाठी त्यांनी पाठपुरावा केला असता केंद्रीय मंत्री जे पी नड्डा यांनी सुपर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल उभारणीसाठी शिक्कामोर्तब केला आहे.शिवाय एम्स स्थापनेबाबत अहवाल मागविण्यात येईल अशी माहितीही त्यांनी दिली आहे.यावेळी खा. डॉ. अनिल बोंडे यांची उपस्थिती होती.



नांदेड येथील शासकीय रुग्णालयावर रुग्णसेवेचा येत असलेला ताण कमी करण्यासाठी आणि अति गंभीर व गुंतागुंतीच्या आजारावर यशस्वी उपचार करून रुग्णांना जीवदान देण्यासाठी, आरोग्य सुविधा दर्जेदार , सकस आणि व्यापक देण्याच्या अनुषंगाने नांदेड येथे एम्सची स्थापना करण्यात यावी अशी मागणी खा. डॉ . अजित गोपछडे यांनी केंद्रीय मंत्री जे पी नड्डा यांच्याकडे २९ डिसेंबर २०२४ रोजी पहिल्यांदा केली होती. त्यानंतर याच मागणीसाठी २७ जानेवारी २०२५ रोजीही ना . नड्डा यांची भेट घेऊन पाठपुरावा केला होता. तर सुपर मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटलसाठी १० फेब्रुवारी २०२५ रोजी खा. डॉ. गोपछडे यांनी मागणी केली होती.त्यानंतर आज पुन्हा याच मागण्यांसाठी खा. डॉ. गोपछडे यांनी केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांची आज नवी दिल्ली येथे ना. नड्डा भेट घेऊन आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी खा. डॉ.बोंडे यांची उपस्थिती होती.

नांदेड जिल्हा हा मराठवाड्यातील एक प्रमुख आणि धोरणात्मक दृष्ट्या महत्त्वाचा जिल्हा आहे . जो केवळ त्याच्या विशाल भोगोलिक क्षेत्र आणि लोकसंख्येमुळेच नव्हे तर तेलंगणा , कर्नाटका आणि महाराष्ट्र या तीन राज्याच्या सीमेजवळ असल्याने विशेष महत्त्व प्राप्त झालेला जिल्हा आहे . नांदेड आणि आसपासच्या ग्रामीण आणि सीमावरती भागात उच्च दर्जाच्या आणि विशेष वैद्यकीय सुविधांचा अभाव मोठ्या प्रमाणात आहे. गंभीर आणि गुंतागुंतीच्या आजारनिग्रस्त असलेल्या रुग्णांना उपचारासाठी नांदेड येथून तब्बल ६५० किलोमीटर असलेल्या मुंबई , पुणे अथवा २५० ते ३०० किलोमीटरवर असलेल्या हैदराबाद आणि छत्रपती संभाजी नगर यासारख्या महानगरांमध्ये जावे लागते. ज्यामुळे उपचारांना विलंब झाल्यास रुग्णांच्या जीवावर बेतत आहे. ही परिस्थिती लक्षात घेता नांदेड जिल्ह्यात अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था स्थापन करण्यात यावी. ज्यामुळे अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा , विशेष उपचार , दर्जेदार वैद्यकीय शिक्षण आणि संशोधनाच्या संधी उपलब्ध होतील . शिवाय डॉक्टर रुग्ण गुणत्तर सुधारण्यात, आरोग्य सेवेतील प्रादेशिक विषमता कमी करण्यात आणि एकूणच आरोग्य पायाभूत सुविधा मजबूत करण्यातही एम्स महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडेल असे खा. डॉ. अजित गोपछडे यांनी आपल्या निवेदनात नमूद केले असून त्यांनी नांदेड येथे असलेल्या डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात सुपर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल सुरू करण्याची मागणी ही केली होती . येथे स्वतंत्र २०० खाटांचे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल सुरू करावे . यासाठी या रुग्णालयाकडे ११५ एकर जमीन उपलब्ध असल्याचेही ना. नड्डा यांच्या निदर्शनास आणून दिले. सुपर मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटलमुळे कॉर्डियलॉजी , न्यूरोलॉजी, कर्करोग, नेफ्रोलॉजी , ट्रॉमा आणि इतर गंभीर आजारांवर स्थानिक उपचार शक्य होईल . ज्यामुळे ग्रामीण भागातील आणि नांदेड जिल्ह्याच्या शेजारील जिल्ह्यातील, राज्यातील रुग्णांनाही त्याचा मोठा लाभ होईल . त्यामुळे एम्स आणि सुपर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल ची स्थापना करण्यासाठी आवश्यक असणारा निधी उपलब्ध करून द्यावा यासाठी आज दुसऱ्यांदा केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांची भेट घेऊन मागणी केली आहे. ना . जे पी नड्डा यांनी या रुग्णालय स्थापनेवर शिक्कामोर्तब केला आहे. शिवाय नांदेड येथे एम्स ची स्थापना करण्यासाठी संबंधित विभागाकडून लवकरच अहवाल मागविला जाईल अशी माहितीही त्यांनी दिली आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत 'शाहू' चे यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ८ फेब्रुवारी :** रायसोनी फाऊंडेशन नागपूर यांच्या वतीने आयोजित जी. एच. रायसोनी करंडक राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन एकांकीका स्पर्धेत येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या संघाने उल्लेखनिय कामगिरी करत यश संपादन केले. या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयाच्या ३५ संघानी आपल्या एकांकीकेचे सादरीकरण केले होते. राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या

संघाने 'ड्रायव्हर' ही एकांकीका सादर करून रसिक प्रेक्षकांबरोबरच परीक्षकांचीही दाद मिळवत रोख ५१ हजार यांचे सांघिक सर्वतृतीय पारितोषिक मिळवून घवघवीत यश संपादन केले. या शिवाय नाटकातील उत्कृष्ट संगीत संयोजनासाठी सागर शिंदे या विद्यार्थ्याला रोख ५ हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक, संदीप घुगरे याला पुरूष अभिनयासाठी सर्वतृतीय व उत्कृष्ट नाट्य दिग्दर्शनाबददल द्वितीय अशी क्रमशः २ व ३ हजाराची पारितोषिके पटकावली. नाट्य लेखक अमोल साळवी लिखीत 'ड्रायव्हर' या एकांकीकेमध्ये संदीप घुगरे, निकिता कोकाटे, आकांक्षा सारंगे, प्रतिक वाघमारे यांच्या प्रमुख भूमिका होत्या. त्याचबरोबर अप्रतिम अशी ध्वनी व प्रकाश योजना शिवम सुतार, सागर शिंदे यांचे संगीत, उत्तम नेपथ्य गणेश झिपरे, उत्कृष्ट रंग व वेशभूषा श्रीराम शिंगण यांनी केलेली होती.या यशाबददल शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील, सचिव प्राचार्य अनिरुद्ध जाधव, प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, पर्यवेक्षक डॉ. भीमराव पाटील सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. हरिसर्वोत्तम जोशी, संघ व्यवस्थापक प्रा. वैभव माने यांनी अभिनंदन केले.



## विविध वृत्त...

### नवीन द्राक्षाची आवक सुरू

**लातूर :** येथील फळबाजारात नवीन द्राक्षाची आवक सुरू झाली आहे. मात्र, प्रतिकिलो १५० ते २०० रूपये प्रतिकिलो विक्री होत आहे. त्यामुळे ग्राहकांचा खरेदीसाठी फारसा प्रतिसाद नसल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले. सध्या आलेल्या द्राक्षाची चव काही प्रमाणात आंबट, गोड असून हंगामाला आता सुरूवात झाली आहे. आवक वाढताच दरात मोठी घसरण होईल, त्यानंतर सर्वसामान्य ग्राहकांनाही त्याची चव चाखता येणार आहे.

### कबड्डी स्पर्धेत प्रथम पारितोषिक

**लातूर :** शहरातील राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटेक्निकच्या विद्यार्थीनींनी नांदेड येथे झालेल्या इंटर इंजिनिअरिंग डिप्लोमा स्टुडन्टस् स्पोर्टस् असोसिएशनच्या विभागीय कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. संघाच्या कर्णधार अक्षता धवन हिने उत्कृष्ट नेतृत्व करून संघाला विजय मिळवून दिला. या यशाबद्दल श्री. वेताळेश्र्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष भिमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्र्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, प्राचार्य संतोष मेतगे, उपप्राचार्या योगिता मेतगे, प्राचार्य माधव मुंडे, क्रीडा प्रमुख डी. पी. पाटील तसेच सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी विजेत्या संघाचे व प्रशिक्षकांचे कौतुक केले.

### युवा भीमसेनेच्या वतीने अभिवादन

**लातूर :** त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून लातूर येथील युवा भीमसेना संघटनेच्या वतीने रमाई स्त्री रुग्णालयात रुग्णांना फळे वाटप करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थापक अध्यक्ष पंकज काटे, महिला जिल्हाध्यक्ष उमाताई आदमाने, सरपंच मार्शलभाऊ माने, आश्रुबा कांबळे, सदस्य महबूब भाई सय्यद, अमोल जाकते, आनंद लांडगे, रोहन रायबोळे, सिद्धार्थ गवळी, गणेश पोटभरे आदी उपस्थित होते.

### हरंगुळ येथील मतदारांची नावे भोईसमुद्रगा गावच्या यादीमध्ये !

**लातूर :** लातूर तालुक्यातील हरंगुळ (बु) गट आणि गणातील काही मतदारांची नावे दुसऱ्या गावच्या यादीत गेल्याने मतदारांची एकच धावपळ उडाली. हरंगुळ (बु) येथील मतदार नेहमीप्रमाणे आपापल्या प्रभागाच्या मतदान केंद्रावर जाऊन मतदान करतात. मात्र, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत काही नावांचे मतदान केंद्र बदलले आहे. त्यामुळे मतदारांची धावपळ उडाली होती. शोधाशोध केली असता, इतर केंद्रावर नावे असल्याचे समजले. याशिवाय, काही मतदारांची दोन-दोन ठिकाणी नावे होती, तसेच हरंगुळ गावातील काही मतदारांची नावे भोईसमुद्रगा गावच्या यादीत गेल्याचे सांगण्यात आले. या संदर्भात निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी नन्हे-विरोळे यांनी आतापर्यंत आपल्याकडे अशा प्रकारची कुठलीही तक्रार आली नसल्याचे सांगितले.

### नीट सुपर स्पेशालिटी परीक्षेत डॉ. लाळे यांचे यश

**लातूर :** राष्ट्रीय पातळीवरील नीट परीक्षेत लातूरच्या डॉ. सुपर स्पेशालिटी सौरभ मारुती लाळे याने उल्लेखनीय यश संपादन करत देशात ४४ वा क्रमांक पटकावला आहे. त्याच्या या यशामुळे लातूरच्या गौरवशाली शैक्षणिक परंपरेत मानाचा तुरा रोवला गेला आहे.

यशामुळे वैद्यकीय क्षेत्रातून डॉ. सौरभचे कौतुक होत देशपातळीवरील अत्यंत स्पर्धात्मक परीक्षेत मिळालेल्या या आहे. कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि जिद्दीच्या जोरावर डॉ. सौरभ याने हे यश मिळवले

त्याने लोकमान्य टिळक महाविद्यालय (सायन), मुंबई येथून एम. डी. मेडिसिन पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आहे. डॉ. सौरभ याचे वैद्यकीय शालेय शिक्षण श्री देशिकेंद्र विद्यालय, लातूर येथे झाले. इयत्ता ११ वी व १२ वीचे शिक्षण त्याने दयानंद कॉलेज, लातूर येथून पूर्ण केले. त्यानंतर त्याने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर पदवी प्राप्त केली. त्याच्या या यशामुळे कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार, शिक्षक व वैद्यकीय क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### व्ही. एस. पँथर्सतर्फे अभिवादन

**लातूर :** लातूर येथील व्ही. एस. पँथर्स युवा संघटनेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहधर्मचारिणी माता रमाई आंबेडकर यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी संघटनेचे ग्रुप जिल्हाध्यक्ष अजय सूर्यवंशी यांच्या हस्ते माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.



यावेळी माता रमाई आंबेडकर यांनी सामाजिक परिवर्तनासाठी दिलेल्या योगदानाचा गौरव करण्यात आला. त्यांचे त्याग, संयम व संघर्षमय जीवन आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.या कार्यक्रमास व्ही. एस. पँथर्स ग्रुप जिल्हाध्यक्ष अजय सूर्यवंशी, हर्षवर्धन कांबळे, आशित सरवदे, संजय सूर्यवंशी, अविनाश सरवदे, सौरभ कांबळे, चिकू जोगदंड, सुमित कांबळे, सोनू लंकेश्र्वर तसेच संघटनेचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# उद्यापासून बारावी परीक्षेला प्रारंभ

## ▶ विभागीय मंडळाची तयारी अंतिम टप्प्यात
## ▶ २५६ केंद्रांवर ९६ हजार विद्यार्थी देणार १२ वीची परीक्षा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ८ फेब्रुवारी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इयत्ता १० वी, १२ वी परीक्षेची तयारी अंतिम टप्प्यात आली असून १२ वी परीक्षेला ९६ हजार ५४२ विद्यार्थी तर १० वी परीक्षेला १ लाख १० हजार ९८३ विद्यार्थी प्रविष्ट होणार आहेत. परीक्षा केंद्रांवर गैरप्रकार होऊ नयेत म्हणून यंदाही मंडळातर्फे विशेष काळजी घेतली जाणार आहे.

शैक्षणिक आयुष्याला नवे वळण देणारी परीक्षा म्हणून दहावी-बारावी परीक्षेकडे पाहिले जाते. १२ वीची परीक्षा १० फेब्रुवारी ते ११ मार्च या कालावधीत तर १० वीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत होणार आहे. त्यामुळे परीक्षेच्या तयारीला वेग आला आहे. परीक्षा केंद्रावर गैरप्रकार होऊ नयेत म्हणून दरवर्षीप्रमाणे वेगवेगळी पथके स्थापन करण्यात आली आहेत. १२ वीसाठी ४७ तर १० वीसाठी ५१ परिरक्षक नेमले आहेत, अशी माहिती विभागीय मंडळाचे अध्यक्ष सुधाकर तेलंग यांनी दिली.

लातूर विभागीय मंडळांतर्गत असलेल्या लातूर जिल्ह्यात १२ वीची परीक्षा १०१ केंद्रांवर होणार असून ३६ हजार ५१२ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. नांदेड जिल्ह्यातील ११२ केंद्रांवर परीक्षा होणार असून ४३ हजार २६९ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. धाराशिव जिल्ह्यातील ४३ परीक्षा केंदांवर ही परीक्षा होणार असून १६ हजार ७६१ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. या परीक्षेसाठी ४७परिरक्षक नेमण्यात आले आहेत. १० वीची परीक्षा लातूर जिल्ह्यातील १५२ केंद्रांवर होणर आहे. ३९ हजार १६९ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. नांदेड जिल्ह्यातील १७८ केंद्रांवर परीक्षा होणार असून ४९ हजार ३९० विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंद केली आहे. धाराशिव जिल्ह्यातील ८९ केंद्रांवर परीक्षा होणार असून २२ हजार ४२४ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट होणार आहेत. या परीक्षेसाठी एकुण ५१ परिरक्षक नेमण्यात आले आहेत, असेही तेलंग यांनी सांगीतले.

## त्यागमूर्ती माता रमाई जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ८ फेब्रुवारी :** विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना खंबीरपणे साथ देणाऱ्या त्यांच्या पत्नी त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांची जयंती लातूर शहरासह जिल्ह्यात उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त विविध जयंती उत्सव मंडळांनी शनिवारी (दि.७) सायंकाळच्या सुमारास आकर्षक देखाव्यांसह भव्य मिरवणुका काढून माता रमाई जयंतीचा आनंदोत्सव साजरा केला.



माता रमाई जयंतीनिमित्त शहराच्या विविध ठिकाणी माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानिमित्त तथागत गौतम बुध्द, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याही प्रमिमांना पुष्प, पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विविध मंडळांनी सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले होते.

**रक्तदान शिबिरासह अन्नदानही विवेकानंद चौकात अभिवादन**

येथील विवेकानंद चौकात माता रमाई आंबेडकर जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून नगरसेवक विकास कांबळे यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक सुनील बसपुरे यांच्यासह जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी समितीच्यावतीने आयोजित रक्तदान शिबिरास नागरिकांचा प्रतिसाद मिळाला. उत्स्फूर्तपणे महिलांनीही रक्तदान केले. यावेळी नागरिकांना अन्नदान करण्यात आले.

शहरातील विविध बुध्द विहारे, संस्था, संघटना कार्यालयांमध्ये माता रमाईंना अभिवादन करण्यात आले. शहराच्या पूर्व भागासह विक्रम नगर, रामजी नगर, प्रकाश नगर, विकासनगर भागातील विविध जयंती उत्सव मंडळांनी हा उपक्रम साजरा केला. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा, पुतळ्यांची मिरवणूक यात नागरिकांसह तरुण-तरुणी, महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कवर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य दुष्यंत कटारे, सुशील चिकटे, भुजंग कांबळे, राम कोरडे, वैभव गायकवाड, बाबासाहेब कांबळे, चाँद शेख, दिगंबर गायकवाड, नीलेश बनसोडे, सिध्दांत चिकटे, गौतम साबळे, नामदेव गायकवाड, निखिल गायकवाड, चिंटू गायकवाड, कैलास कांबळे, प्रवीण कांबळे, रवी कांबळे, मेजर राजाराम साबळे, आशा चिकटे, सुजाता अजनीकर यांच्यासह समता सैनिक दलाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रा. मीरा बलभीम कोथिंबिरे यांना पी.एच.डी. प्रदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ८ फेब्रुवारी :** डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालयात कार्यरत असणाऱ्या सहा. प्रा. मीरा बलभीम कोथिंबिरे यांना विधी शाखेतील संशोधन कार्याबद्दल पी.एच. डी. पदवी घोषित करण्यात आली आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड (एस. आर. टी. एम. यू. एन.) अंतर्गत असणाऱ्या श्री शिवाजी विधी महाविद्यालय, परभणी येथील संशोधन केंद्रातून त्यांना ही पदवी मिळालेली आहे. त्यांचा ए स्टडी ऑफ कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी : इश्यूज अँड चॅलेंजेस विथ स्पेशल रेफरन्स टू टाटा मोटर्स इन इंडिया हा संशोधनाचा विषय होता. या संशोधनासाठी त्यांना डॉ. राजेश देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले.



संशोधनासाठी प्राचार्य डॉ. धर्मापुरीकर, डॉ प्राचार्य डॉ. पी. जे. हेरोडे आणि प्रो. डॉ. संजय रत्नपारखे यांनी सहकार्य केले. या यशाबद्दल पत्रकार नरसिंह घोणे, प्रा. अनंत लांडगे, प्रा. एस. टी. मस्के, प्रा. विजय शृंगारे, प्रा. व्यंकटराव जाधव, कल्याणराव देवकत्ते, प्रा. उमाकांत जाधव, अंबादास पोटभरे व त्यांचे कुटुंबीय, मित्रपरिवार आणि महाविद्यालयीन सहकारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## माता रमाई यांची जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ८ फेब्रुवारी :** शहरात त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विश्र्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३४ व्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे त्रिसरण, पंचशील ग्रहण करण्यात आले. यावेळी माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. समितीचे अध्यक्ष सुशीलकुमार चिकटे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

## कै. प्रयागबाई पाटील कनिष्ठ महाविद्यालयात पालक सुसंवाद मेळावा; गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ८ फेब्रुवारी :** येथील कै. प्रयागबाई पाटील कनिष्ठ महाविद्यालयात पालक सुसंवाद मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्याला पालकांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद लाभला.

अध्यक्षस्थानी प्राचार्य एकनाथ पाटील होते. प्रमुख पालक प्रतिनिधि गोपाळ नरवडे व विद्या गाजरे हे उपस्थित होते. सुरुवातीला सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून मेळाव्याची सुरुवात करण्यात आली. स्वागत व प्रास्ताविक प्रा. वर्षाराणी कांबळे यांनी केले. प्राचार्य, पाटील यांनी पालकांशी संवाद साधताना महाविद्यालयातील शैक्षणिक उपक्रम, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या योजना तसेच शिस्त, उपस्थिती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण यावर विशेष भर दिला. विद्यार्थ्यांच्या करिअर घडविण्यासाठी पालक-शिक्षक यांचा परस्पर संवाद किती महत्त्वाचा आहे यावर मार्गदर्शन केले. तसेच कला विभाग प्रमुख प्रा. भगवान सुरकुटे, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. सुरेंद्र खपाटे व विज्ञान विभाग प्रमुख प्रा. वर्षाराणी कांबळे यांनी आपापल्या विभागाची माहिती दिली.

मेळाव्यात विविध शैक्षणिक व सामाजिक प्रश्र्नांवर पालकांनी आपली मते मांडली. विद्यार्थ्यांच्या अडचणी, अभ्यास पद्धती, मोबाईल व इंटरनेटचा योग्य वापर, अभ्यासाबरोबर सांस्कृतिक व क्री डा उपक्रमांत सहभाग अशा विविध विषयांवर फलदायी चर्चा झाली. सूत्रसंचालन प्रा. धनराज मस्के यांनी केले तर आभार प्रा. झाकीर कादरी यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. जाधव सतीश, प्रा. लवटे प्रसाद, प्रा. क्षीरसागर शिवानंद, प्रा. जाधव जीवन, प्रा. प्राची जाधव, प्रा. अजय मिरकले प्रा. तोडकर, प्रा. अमोल पाटील, प्रा. दीपक मुंडे, प्रा. मयुरी बिरादार, प्रा. नारायणकर, प्रा. बळीराम मोठेराव, प्रा. राजे, प्रा. क्षीरसागर,, प्रा. जोशी, प्रा. महादेव बरूरे, वृषल ढेपे, दयानंद भारती, जवळगेकर, परमेश्र्वर लवटे यांचे सहकार्य लाभले.

### इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील
## उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह योजना

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ८ फेब्रुवारी :** राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सन २०२३-२४ पासून लातूर जिल्ह्यात दोन शासकीय वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत. यात मुलांसाठी १०० आणि मुलींसाठी १०० अशा एकूण २०० विद्यार्थी क्षमतेच्या वसतिगृहांचा समावेश आहे.

या वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना भोजन, निवास आणि शैक्षणिक साहित्य मोफत पुरवले जाते. या वसतिगृह प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांनी १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवाशी असावा. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक असून पालकांचे वार्षिक उत्पन्न २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. विद्यार्थी त्या शहराचा स्थानिक रहिवाशी नसावा, जिथे शैक्षणिक संस्था आहे. विद्यार्थ्याने बारावीनंतरचे उच्च शिक्षण घेतलेले असावे आणि बारावीत किमान ६० टक्के गुण असावेत. सन २०२५-२६ साठी रिक्त जागांवरील वसतिगृह प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांनी १८ सप्टेंबर २०२५ पर्यंत https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करावेत. मुलींच्या वसतिगृहाबाबत माहितीसाठी गृहपाल श्रीमती वृषाली बडे (मो. ९०२८२६११८३) आणि मुलांच्या वसतिगृहाबाबत माहितीसाठी गृहपाल तिरुके सुरज (मो. ८३२९४४७४१०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक अभय अटकळ यांनी केले आहे.

# सखी प्रेरणा दिवस उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ८ फेब्रुवारी :** स्वयं शिक्षण प्रयोग संस्थेच्या संस्थापिका प्रेमाताई गोपालन यांचा जन्मदिवस दरवर्षी सखी प्रेरणा दिवस म्हणून साजरा केला जातो. याच परंपरेनुसार यंदाही १ फेब्रुवारी २०२६ रोजी सखी प्रेरणा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी ग्रामीण भागात महिला सक्षमीकरण, महिला नेतृत्व आणि शाश्वत उपजीविकेसाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ३० शेतकरी महिलांना 'सखी प्रेरणा पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

लातूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधून संस्थेच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रीय सहभाग असलेल्या ३०० महिला प्रतिनिधी सहभागी झाल्या होत्या. कार्यक्रमाचा उद्देश ग्रामीण महिलांच्या कार्याची दखल घेणे, त्यांच्या नेतृत्वाला प्रोत्साहन देणे आणि इतर महिलांना प्रेरणा देणे हा होता. कार्यक्रमाला मांजरा कृषी विज्ञान केंद्राच्या शाखज्ञ सौ. अंजली गुंजाळ

तसेच अनिल पिसाळ हे मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. प्रास्ताविकात दिलीप घवन यांनी सखी प्रेरणा दिवसाचे महत्त्व विशद केले. १९९३ मध्ये सुरू झालेल्या स्वयं शिक्षण प्रयोग संस्थेने आजपर्यंत ८

राज्ये, ३५ जिल्हे, ११,५०० हुन अधिक महिला लीडर्स, ७,१०,३६५ महिला उद्योजक आणि सुमारे ७० लाखांहून अधिक लोकांपर्यंत आपले कार्य पोहोचवले असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी सौ. अंजली गुंजाळ यांनी प्रेमाताईंची विचारधारा प्रत्यक्ष आचरणात आणण्याचे महत्त्व अधोरेखित केले. महिलांनी केवळ शेतीतील मजूर म्हणून न राहता उत्पादन प्रक्रियेत सहभागी होऊन शेतकरी म्हणून पुढे यावे, असे त्यांनी सांगितले. सेंद्रिय शेतीचे फायदे, आरोग्यविषयक जागरूकता आणि कुटुंबाच्या आरोग्यासाठी महिलांची भूमिका यावर त्यांनी भर दिला. जिल्ह्यात अनेक महिला आज स्वतःचा व्यवसाय उभारून इतर महिलांनाही सक्षम करत असल्याचे त्यांनी नमूद केले. त्याचप्रमाणे महिलांच्या यशोगाथा 'सखी' पुस्तकाचे प्रमुख पाहुण्याच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रेमाताई गापालन यांचा आ दर्श डोळ्यासमोर ठेवून स्वयं शिक्षण प्रयोग संस्थेचे कार्य अधिक व्यापक करण्याचा संकल्प उपस्थित महिलांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्वयं शिक्षण प्रयोग, लातूर येथील संपूर्ण टीमने परिश्रम घेतले.